मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २३२ ■ सोमवार, ०४ मे २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# ‘सेल्फी’ साठी कनेक्टिंग लिंकवर थांबू नका; सीसीटीव्हीची २४x७ नजर राहणार

**मुंबई :** यशवंतराव चव्हाण मुंबई -पुणे द्रुतगती मार्गावरील कनेक्टिंग लिंक (मिसिंग लिंक) लोकार्पणानंतर वाहतुकीसाठी सुरू करण्यात आली आहे. मात्र, प्रवासादरम्यान सेल्फी, फोटो, घेण्यासाठी वाहन चालक केबल स्टेड ब्रिज व बोगद्याजवळ वाहने थांबवत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. द्रुतगती मार्गावर वाहने थांबवण्यास परवानगी नसून वाहनधारकांसाठी अपघाताचा धोका असल्याने ते टाळावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्यावतीने करण्यात येत आहे.महाराष्ट्र दिनी रोजी यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे मार्गावरील कनेक्टिंग लिंक अर्थात मिसिंग लिंकचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह अन्य मान्यवरांच्या हस्ते लोकार्पण झाले.

महामार्ग पोलिसांनी अधिसूचनेद्वारे मुंबई-पुणे कनेक्टिंग लिंक प्रकल्पासाठी वेग मर्यादा जाहीर केली आहे. तसेच बोगद्यात हलक्या मोटार वाहनांसाठी ताशी १०० किमी वेग मर्यादा आणि बस व प्रवासी वाहनांसाठी ताशी ८० किमी वेग निश्चित केला आहे. कनेक्टिंग लिंक प्रकल्पातील दोन बोगदे व दोन पुलावर पूर्णपणे



२४x७ सीसीटीव्ही यंत्रणेचे लक्ष आहे. यावर देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र नियंत्रण कक्ष असून द्रुतगती मार्गावर थांबणाऱ्या गाड्यांची माहिती महामार्ग पोलिसांना दिली जाणार आहे.सेल्फी, फोटो आणि रिल काढण्यासाठी थांबू नका, नाहीतर मोठ्या दंडाची आकारणी होऊ शकते. तसेच तुमच्यासह इतरांच्याही वाहनांना धोका होऊ शकतो. या कारणास्तव, नियमांचे पालन करा आणि सुरक्षित, सुखकर प्रवास करा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

## संक्षिप्त

### थोर समाजसुधारक जनार्दन भगत यांच्या पुण्यतिथीनिमित्त सामाजिक कार्यक्रम : सोमवारी नियोजन आढावा बैठक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** थोर समाजसुधारक स्वर्गीय जनार्दन भगत साहेब यांच्या 38 व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाची नियोजन आढावा बैठक सोमवार दिनांक 4 मे रोजी आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक सायंकाळी 6 वाजता उलवे नोड मधील सेक्टर 12 येथील रामशेठ ठाकूर मैदान येथे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. जनार्दन भगत यांच्या पुण्यतिथीनिमित्त होणारा कार्यक्रम श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने साजरा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाची तयारी अंतिम टप्प्यात आली असून त्याची आढावा बैठक होणार आहे. तरी संबंधितांनी या बैठकीस उपस्थित रहावे, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी केले आहे.

### बंबावीपाडा परिसरात महिलेची हत्या

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** पनवेल तालुक्यातील बंबाबी पाडा परिसरात एका महिलेचा मृतदेह पनवेल शहर पोलिसांना सापडून आला. या महिलेची अज्ञाताने हत्या केली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. जुना उरण- पनवेल रस्ता, बंबावीपाडा येथील नागरिकांना रेल्वेच्या पुढे डाव्या हाताला ब्लॅकेट मध्ये गुंडाळलेल्या अवस्थेत पंचवीस ते तीस वर्षीय महिलेचा मृतदेह सापडून आला. या प्रकाराची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळाल्यानंतर पनवेल पोलीस घटनास्थळी दाखल झाले. या महिलेची गळा आवळून हत्या करण्यात आली असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेतला असून आरोपीचा शोध सुरू केला आहे.

### साखरपुड्याला जाणाऱ्या बसचा अपघात, तिघेजण गंभीर जखमी, काहीजण किरकोळ जखमी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** साखरपुडयाला जाणाऱ्या बसचा अपघात होऊन बस पलटी झाल्याची घटना पनवेल तालुक्यातील शिरढोण जवळ घडली. या अपघातात तिघेजण गंभीर जखमी झाले असून 16 ते 17 जण किरकोळ जखमी झाल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांनी दिली. शहाड येथून बस माणगावच्या बाजूला साखरपुड्याच्या समारंभासाठी रविवारी सकाळी जात होते. यावेळी शिरढोण जवळील एका हॉटेल जवळ एरटिगा गाडी बाहेर निघत असताना बसवरील चालकाला बस नियंत्रित झाली नाही आणि बस डिव्हायडरला धडकली आणि पलटी झाली. या अपघातात एक जण गंभीर जखमी झाला तर दोघेजणांना फ्रॅक्चर झाले आहे तर 16-17 जण किरकोळ जखमी झाले आहेत. यातील एकावर एमजीएम रुग्णालय आणि दोघांवर उपजिल्हा रुग्णालय पनवेल येथे उपचार सुरू आहेत.

### महिलेला अशलील इशारे केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**


**नवीन पनवेल प्रतिनिधी :** महिलेला अश्लील इशारे केल्याप्रकरणी भास्कर नारायण शिंदे (राहणार यशोज लाईन आरएएफ बटालियन नंबर 102, खारघर) यांच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पीडित फिर्यादी या आरएएफ सिग्नल, पापडीचा पाडा येथील रिक्षा स्टॅन्ड वरील बाकड्यावर बसलेले असताना आरोपी यांनी त्यांच्याजवळ येऊन तुझा काय रेट आहे असे बोलला आणि बाजूला असलेल्या टपरीवर जाऊन पैशांचा इशारा करून जवळ बोलावले. आणि छेड काढली. त्यानंतर पुन्हा अश्लील इशारा केला. या प्रकरणी आरोपी भास्कर नारायण शिंदे याच्या विरोधात एक मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

## महाराष्ट्र दिनानिमित्त माहीममध्ये भव्य रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**किशोर गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख :** महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधत शिवसेना माहीम विधानसभा यांच्या वतीने शुक्रवार दिनांक १ मे २०२६ रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. माननीय सदा सरवणकर साहेब, अध्यक्ष – श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (राज्यमंत्री दर्जा) तसेच माजी नगरसेवक समाधान सरवणकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.सामाजिक बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरामध्ये युवकांसह महिला वर्गानेही मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला. विशेष म्हणजे “लाडक्या बहिणींनी” देखील पुढाकार घेत रक्तदान करून सामाजिक





कार्यात आपले योगदान दिले. महाराष्ट्र दिनानिमित्त राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे परिसरात सामाजिक एकोपा आणि जनजागृतीचे वातावरण निर्माण झाले होते.शिबिर यशस्वी करण्यासाठी माहीम विधानसभेतील शिवसेना पदाधिकारी, शाखाप्रमुख, महिला आघाडी सदस्य तसेच कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. रक्तदात्यांच्या नोंदणीपासून ते वैद्यकीय तपासणीपर्यंत सर्व नियोजन शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. रक्तदानासाठी आलेल्या नागरिकांच्या सोयीसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती. या रक्तदान शिबिरासाठी जे. जे. महानगर रक्तकेंद्राच्या वैद्यकीय पथकाने मोलाचे सहकार्य केले. डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत सुरक्षित व नियोजनबद्ध पद्धतीने रक्तसंकलन करण्यात आले. रक्तदानानंतर प्रत्येक रक्तदात्यास आकर्षक भेटवस्तू देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.यावेळी उपस्थित मान्यवरांनी रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करत, “रक्तदान हेच श्रेष्ठदान असून एका रक्तदात्यामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात,” असा संदेश दिला. समाजहितासाठी असे उपक्रम सातत्याने राबविण्याचा मानसही आयोजकांनी व्यक्त केला.

## कामगारांच्या हक्कांसाठी जागतिक कामगार नेते एकत्र लढू : महेंद्रशेठ घरत

**दैनिक युवक आधार**

**उलवे,प्रतिनिधी :** "भारतीय कामगारांनी शेकडो वर्षे लढून मिळविलेले हक्क आणि कायदे बीजेपीच्या केंद्र सरकारने पायदळी तुडविले आहेत. २०१४ पासून आम्ही हे भोगत आहोत. त्यामुळे कामगार विरोधी धोरणे राबविणाऱ्या केंद्र सरकारचा आम्ही धिक्कार करीत आहोत. मी गेली ३८ वर्षे कामगारांसाठी लढतोय. दरम्यान, अनेक गुन्हे नावावर दाखल झाले आहेत; परंतु कामगारांच्या न्याय हक्कांसाठी मागे हटलो नाही. सध्या साडेतीन कोटी कामगारांचे नेतृत्व करताना आमची आयटीयुसी संघटना ताकदीने भक्कमपणे उभी आहे. त्यामुळे आम्ही सर्व जागतिक कामगार नेते कामगारांच्या न्याय हक्कांसाठी सदैव लढत राहू. नेपाळ सरकारने कामगारविरोधी भूमिका घेतल्यास आम्ही सारे रस्त्यावर उतरू आणि सरकारला 'सळो की पळो' करू," असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ महेंद्रशेठ घरत कामगारांना मार्गदर्शन करताना नेपाळमध्ये म्हणाले.

महाराष्ट्र दिन आणि जागतिक कामगार




दिनानिमित्ताने नेपाळ ट्रेड युनियन कॉंग्रेसतर्फे दुसऱ्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन शुक्रवारी (ता.१) करण्यात आले होते. त्यावेळी महेंद्रशेठ घरत प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.या परिषदेसाठी आयटीएफ लंडनचे जनरल सेक्रेटरी स्टीफन कॉटन, आशिया पॅसिफिक रिजनल सेक्रेटरी अब्दुल गनी सारंग, नेपाल कॉंग्रेस अध्यक्ष गगन थापा, कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते शेखरजी कोईराला, नेपाळ ट्रेड युनियनचे अध्यक्ष योगेंद्र कुमार, नेपाळ ट्रेड युनियन तथा आयटीएफचे एक्झिक्युटिव्ह बोर्ड मेंबर अजयकुमार राय इत्यादी यावेळी उपस्थित होते. नेपाळ ट्रेड युनियन कॉंग्रेसतर्फे दुसऱ्या राष्ट्रीय कामगार परिषदेचे उत्तम आयोजन केल्याने महेंद्रशेठ घरत यांनी त्यांचे अभिनंदन केले.



# देगलूर पंचायत समिती येथे सेवानिवृत केंद्र समन्वयक यांचा सेवापुर्ती,शिक्षक, विद्यार्थी,शाळा,कार्यगौरव सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**.तालूका प्रतिनिधी:महादेव उप्पे** : देगलूर(दि.०४) गटशिक्षणाधिकारी कार्यालय पंचायत समिती देगलूर येथे सेवानिवृत्त केंद्र समन्वयक किशवे साहेब आणि तलवाडे साहेब यांचा सेवापुर्ती कार्य गौरव सोहळा तसेच राज्य,विभाग स्तरावरील विविध स्पर्धेतील प्राविण्य मिळवलेल्या शिक्षकांचा,क्रीडा स्पर्धेतील पंच, sqaaf बाह्य मूल्यांकनात प्रथम आलेल्या शाळा,आयडॉल शिक्षक,खान अकॅडमी जयंत नारळीकर गणित विज्ञान अध्ययन कार्यक्रम,विज्ञान प्रदर्शन व इन्स्पायर अवॉर्ड साठी पात्र ठरलेल्या शिक्षक,शाळा,विद्यार्थी यांचा गौरव सत्कार समारंभ जितेश रावसाहेब अंतापूरकर साहेब आमदार देगलूर बिलोली विधानसभा यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्रीकांत बळदे साहेब गट विकास अधिकारी(पंचायत समिती देगलूर)मा.नीलम कांबळे मॅडम मुख्याधिकारी (न.पा देगलूर)यांच्या उपस्थितीमध्ये अत्यंत उत्साही प्रसन्न वातावरणामध्ये शिस्तबद्ध पद्धतीने सर्वांना प्रमाण प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.



या कार्यक्रमांमध्ये शिक्षकांसोबतच सर्व संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचाही सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वन्नाळी केंद्राचे केंद्र समन्वयक हणमंत जाधव सरांनी केले तर आभार प्रदर्शन भायेगाव केंद्राचे केंद्रसमन्वयक श्री सुधाकर बोडके सरांनी केले.या कार्यक्रमामुळे शिक्षकांच्या चेहऱ्यावर उत्साह प्रेरणा व स्फूर्ती दिसून आली.

या कार्यक्रमाचे प्रमुख नियोजक पंचायत समितीचे शिस्तप्रिय कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी बालाजी गोडाजी साहेब व शिक्षण विस्तार अधिकारी हमीद दौलताबादी साहेब,पंचायत समितीचे सर्व केंद्रप्रमुख चैनपुरे सर,रवी जाधव सर,सौ.कुऱ्हाडे मॅडम,हणमंत जाधव सर,विजयकुमार स्वामी,ज्ञानेश्वर पाटील,अनंत पांढरे सर,सुधाकर बोडके सर सर्व विशेष शिक्षक व विषय तज्ज्ञ शिक्षक यांनी हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले.

# अलिबाग तालुक्यात सहाण बायपासवर मिनीडोर, इको कारमध्ये भीषण धडक

## माजी सरपंचाच्या कुटुंबातील प्रवाशाला गंभीर दुखापत

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा** : अलिबाग तालुक्यातील सहाण बायपास परिसरात रविवारी दुपारी दोन वाहनांमध्ये समोरासमोर भीषण अपघात झाला. रामराज ग्रामपंचायतीचे माजी सरपंच हिराजी काष्टे यांच्या मालकीची इको कार (MH-06-CL-0414) आणि खानाव येथील संतोष मगर यांच्या मिनीडोर (MH-06-S-3001) यांच्यात धडक झाल्याने काही काळ रस्त्यावर तणावाचे वातावरण निर्माण झाले. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही, तरी इको कारमधील एका प्रवाशाला गंभीर दुखापत झाली असून, इतर काही जण किरकोळ जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, इको कारमध्ये सहा प्रवासी होते, ज्यात रामराज ग्रामपंचायतीचे माजी सरपंच हिराजी काष्टे यांचे कुटुंबीय आणि नातेवाईकांचा



समावेश होता. अपघातात सुरेश लागे या प्रवाशाच्या पायाला गंभीर दुखापत झाली असून, त्यांच्यावर अलिबाग येथील स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत. डॉक्टरांनी त्यांच्या स्थितीला 'गंभीर पण स्थिर' असा दुर्लक्षित केला आहे. इतर प्रवाशांना किरकोळ मार, खरडा आणि किरकोळ दुखापती झाल्या असून, त्यांना प्राथमिक उपचारानंतर डिस्चार्ज देण्यात आला आहे. दुसरीकडे, मिनीडोरमध्ये पाच प्रवासी होते, ज्यात संतोष मगर यांचे कुटुंब आणि मित्रमंडळींचा समावेश होता. या वाहनातील प्रवाशांना कोणतीही दुखापत झाली नसून, ते सर्व सुखरूप आहेत.

अपघात दुपारी २ वाजण्याच्या सुमारास घडला. सहाण बायपास हा अलिबाग-मुंबई महामार्गाशी जोडलेला व्यस्त रस्ता असून, इथे वाहनांच्या वेगामुळे वारंवार अपघात घडतात. प्राथमिक माहितीनुसार, दोन्ही वाहने समोरासमोरी आल्याने धडक झाली. इको कार पूर्णपणे मागे वळली असून, मिनीडोरचे समोरेचे भाग खराब झाले आहेत. अपघाताने रस्त्यावर ३० मिनिटे वाहतुकीचा प्रचंड गोंधळ उडाला होता.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, रामराज आणि खानाव ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. अलिबाग तालुका पोलिस आणि स्थानिक ट्रॅफिक पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी पोहोचून जखमींना वाहनांमधून बाहेर काढले आणि अलिबाग उपजिल्हा रुग्णालयात नेले. पोलिस निरीक्षकांच्या नेतृत्वाखालील तपास पथकाने घटनास्थळाची पाहणी केली असून, ड्रायव्हरांच्या जबाबांची नोंद घेतली आहे. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी, वेगावर नियंत्रण नसणे किंवा रस्त्यावरील खराब स्थिती कारणीभूत असल्याचे संशय व्यक्त केला जात आहे. पोलिसांकडून वाहनांचे परवाने, विमा तपास आणि ब्लड सॅम्पल तपासणीसाठी पाठवले जात आहेत.

या अपघाताने स्थानिक ग्रामस्थांमध्ये भीती निर्माण झाली असून, सहाण बायपास रस्त्याच्या दुरुस्तीची आणि वेग नियंत्रणासाठी स्पीड ब्रेकर बसवण्याची मागणी जोर धरली आहे.

गेल्या वर्षी या रस्त्यावर अनेक अपघात घडले असून, प्रशासनाकडून योग्य उपाययोजना केल्या नाहीत, असे स्थानिकांचे मत आहे. पोलिसांनी पुढील तपास सुरू ठेवला असून, दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती दिली आहे.

# एल आय टी जगाला उत्तम इंजिनियर्स देईल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राकेश यादव वाडी नागपूर** : आठ दशकांपासून कार्यरत असलेल्या एल आय टी चे विद्यार्थी आज जगभरात आहेतच, परंतु भविष्यातही देशाला व जगाला उत्तम इंजिनियर्स देण्याचे काम लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठ करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक व प्रशासकीय सुविधांच्या एकत्रित बांधकामाचे भूमिपूजन मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते आज सकाळी झाले. त्यानंतर ते बोलत होते. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महापौर नीता ठाकरे या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

काही वर्षांपूर्वी या संस्थेला विद्यापीठाचा दर्जा दिल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, त्यामुळे दर्जा तर वाढलाच परंतु आता येथे भव्य व सुंदर शैक्षणिक संकुल उभारण्यात येणार आहे. एक आंतरराष्ट्रीय दर्जाचे शैक्षणिक केंद्र म्हणून या विद्यापीठाची ओळख असेल, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.


प्रारंभी दीप प्रज्वलन झाले. त्यानंतर मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी भूमिपूजन केले. प्रास्ताविक कुलगुरू डॉ. अतुल वैद्य यांनी केले. लक्ष्मीनारायण इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी ,(एल आय टी) या संस्थेला मुख्यमंत्र्यांनी विद्यापीठाचा दर्जा दिला त्यानंतर या संस्थेचे नाव लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठ झाल्याचे डॉ. वैद्य यांनी प्रास्ताविकात सांगितले. कार्यक्रमाचे संचालन सौरभ जोगळेकर यांनी केले. आभार कुलसचिव डॉ. नीरज खटी यांनी मानले. आ. विकास ठाकरे, आ. कृपाल तुमाने, विद्यापीठाच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष डॉ. गणपती यादव, प्रमुख सल्लागार मोहन पांडे प्रभृती यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.

# बंबई पाडा परिसरात आढळला एका महिलेचा संशयास्पद मृतदेह

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर )** : तालुक्यातील बंबई पाडा परिसरात रविवारी सकाळी एका महिलेचा संशयास्पद मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. अज्ञात कारणावरून महिलेचा गळा आवळून खून केल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात असून, परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, बंबई पाडा येथील रहिवाशांना सकाळच्या सुमारास संबंधित महिला घरात मृतावस्थेत आढळून आली. तिच्या गळ्यावर आढळलेल्या खुणांवरून हा खून गळा आवळून करण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. घटनेची माहिती मिळताच नागरिकांनी तात्काळ पोलीसांना कळवले. घटनास्थळी पोलीस पथक दाखल होऊन पंचनामा करण्यात आला असून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला





आहे. या प्रकरणातील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी वैयक्तिक वाद, कौटुंबिक कारण किंवा इतर कोणता गुन्हेगारी हेतू याबाबत पोलीस सर्व बाजूंनी तपास करत आहेत. दरम्यान, परिसरातील नागरिकांकडूनही चौकशी सुरू असून, सीसीटीव्ही फुटेज आणि इतर तांत्रिक पुराव्यांच्या आधारे आरोपींचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. या घटनेमुळे बंबई पाडा परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

# डिजिटल जनगणनेला तळा तालुक्यात प्रारंभ

## तालुक्यातील नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा– तळा तहसिलदार श्रीमती . स्वाती पाटील

**दैनिक युवक आधार**

**तळा / नितीन लोखंडे** : केंद्र सरकारच्या निर्देशानुसार तळा तहसीलदार श्रीमती. स्वाती पाटील, तळा पंचायत समिती उपसभापती श्री. रवींद्र मांडवकर यांची प्रथम स्वगणनना करून तालुक्यातील डिजिटल जनगणनेला सुरुवात करण्यात आली आहे. यावेळी पहिल्यांदाच मोबाईल ॲपच्या माध्यमातून डिजिटल पद्धतीने नागरिकांची माहिती संकलित केली जाणार आहे. देशाच्या इतिहासातील सोळावी तर स्वातंत्र्यानंतरची आठवी जनगणना असणार आहे ही जनगणना दोन टप्प्यांमध्ये पार पडणार आहे पहिला टप्पा 1 मे ते 14 जुन 2026 या




कालावधीमध्ये राबविण्यात येणार आहे. नागरिकांनी https://se.census.gov.in/ वेबसाईटचा वापर करून self enumeration द्वारे स्वतःची माहिती ॲप द्वारे ऑनलाईन भरता येणार आहे किंवा प्रगनकांकडून घरोघरी प्रत्यक्ष भेटी देऊन माहिती डिजिटल पद्धतीने संकलित केली जाणार आहे. यामध्ये घर क्रमांक, घरांची सध्याची स्थिती, घरातील कुटुंब संख्या, घरातील विवाहितांची संख्या, शौचालय, स्नानगृहाची उपलब्धता, टीव्ही, रेडिओ, लॅपटॉप, टेलिफोन, मोबाइल, मोटरसायकल, चार चाकी वाहन, कुटुंबप्रमुखाचे नाव लिंग, जात, पिण्याच्या पाण्याची सुविधा, पाण्याचा स्रोत, लाईटची सुविधा, गॅस कनेक्शन इत्यादी विषयी माहिती संकलित केली जाणार आहे. दुसरा टप्पा प्रत्यक्ष जनगणना फेब्रुवारी 2027 मध्ये होणार आहे. जनगणना ही देशाच्या सर्वांगीण विकासाचा पाया आहे. तळा तालुक्यातील नागरिकांनी राष्ट्रीय कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवून अचूक माहिती देऊन तळा प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन तळा तहसीलदार श्रीमती. स्वाती पाटील यांनी केले आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान तपासणी समितीत गजानन हगवणे यांची निवड

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय** : मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत राज्यस्तरीय मूल्यमापन समितीच्या अधिपत्याखाली गठीत करण्यात आलेल्या तालुकास्तरीय तपासणी समितीवर काटेवाडी-भवानीनगर परिसरातील पत्रकार तसेच बारामती तालुका पत्रकार संघटनेचे सचिव गजानन हगवणे यांची निवड करण्यात आली आहे.त्यांच्या या निवडीमुळे पत्रकारितेसह सामाजिक क्षेत्रातही आनंद व्यक्त होत आहे.बारामतीचे गटविकास अधिकारी किशोर माने यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती गठीत करण्यात आली असून,पत्रकार संघटनेच्या प्रतिनिधी म्हणून गजानन हगवणे यांचा समावेश करण्यात आला आहे.सदर समितीला कोकण विभागातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यातील गावांचे प्रत्यक्ष भेटीद्वारे मूल्यमापन करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे.

या निवडीबाबत प्रतिक्रिया देताना गजानन हगवणे यांनी सांगितले की, “कोकण विभागातील गावांची तपासणी करण्याची संधी मिळणे ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे.उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार (वहिनीसाहेब) यांच्या मार्गदर्शनाबद्दल मी विशेष आभारी आहे.तसेच पत्रकारितेतून अभियानाच्या प्रसिद्धीसाठी केलेल्या अल्पशा कार्याची ही पावती असल्याची भावना आहे. सर्वांच्या शुभेच्छा आणि सहकार्यामुळे ही जबाबदारी समर्थपणे पार पाडण्याचा प्रयत्न करणार आहे.”दरम्यान शासनाने गठीत केलेल्या या समितीत गटविकास अधिकारी किशोर माने (अध्यक्ष), गजानन हगवणे (पत्रकार प्रतिनिधी), सुनिल जगताप (विस्तार अधिकारी, पंचायत समिती), नितीन शिर्के (प्रशासन विभाग वरिष्ठ अधिकारी), सागर दळवी तसेच स्वयंसेवी संस्थेचा प्रतिनिधी यांचा समावेश आहे.ही समिती ३० एप्रिल २०२६ पासून सावंतवाडी तालुक्यातील विविध गावांना भेट देऊन शासनाच्या निकषांनुसार ग्रामविकास, स्वच्छता, पायाभूत सुविधा, जलव्यवस्थापन, लोकसहभाग आदी मुद्द्यांवर सखोल तपासणी करणार आहे. या मूल्यमापनाच्या आधारे संबंधित गावांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात येणार असून, अभियानाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी महत्त्वपूर्ण दिशा मिळणार आहे.

# कौटुंबिक वादातून इसम बेपत्ता

**दैनिक युवक आधार**



**पनवेल , ( वार्ताहर )** : कौटुंबिक वादातून एक इसम राहत्या घरातून कोठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

हरीषचंद्र बाळु कोळी, वय ६५ वर्षे, रा.कलश हील, रूम नं १०६, से.०३, प्लॉट नं. ४३, ता. पनवेल, उंची ५.५ फुट अंदाजे, बांधा मध्यम, रंग- सावळा, चेहरा-सरळ, केस पांढरे काळे, अंगात नेसुन निळया रंगाचा शर्ट, व खाकी रंगाची पॅन्ट परिधान केलेला, भाषा मराठी, हिंदी बोलणारा अशा वर्णानाचा इसम आहे . याबाबत कोणाला अधिक माहित असल्यास त्यानी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोहवा अतुल देवकर यांच्याशी संपर्क साधावा .

# सांगवी पाटण येथे संयुक्त जयंती उत्सव उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी :- मारुती सत्रे** : आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे बौद्धजन सेवा फाउंडेशनच्या वतीने महामानवांचा संयुक्त जयंती महोत्सव उत्साहात पार पडला. यावेळी भगवान गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले या चार महापुरुषांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

ध्वजारोहण व धम्म सलामी

सकाळी १० वाजता पंचशील ध्वजारोहणाची वंदना करून अशोक खंडागळे, आल्हाद खंडागळे व सर्वांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले. दुपारी १ वाजता समता सैनिक दलाच्या १५ ते २० जणांच्या पथकाने वंदना व धम्म सलामी देत मार्गदर्शन केले.

बुद्ध विहाराचे नामकरण

सांगवी पाटण येथील बुद्ध विहाराचे 'संघवी' असे नामकरण सरपंच जयाताई दत्तात्रय खोटे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी विहाराच्या प्रवेशद्वारावर फलकाचे अनावरण करण्यात आले.

भव्य मिरवणूक

गावामधून भव्यदिव्य, वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत सर्व जाती-धर्माच्या लोकांनी सहभाग घेतला. बालगोपाल ते वृद्धांपर्यंत सर्वांनी नाचत आनंद लुटला.

पूजन व मनोगत

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भगवान बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या



प्रतिमांचे पूजन करण्यात आले. छोटी चिमुकली अनुष्का अक्षय मोरे हिने भीमगर्जना केली समाजसेवक समीर शेख, पत्रकार दादा पवळ, विजय मरकड, विलास खंडागळे, योगेश बोराडे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन समीर शेख यांनी केले तर सुनील खंडागळे यांनी आभार मानले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना आदरांजली

कार्यक्रमात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. ते भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, समाजसुधारक, कायदेतज्ज्ञ व अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्य प्रदेशातील महू (आता डॉ. आंबेडकर नगर) येथे झाला. त्यांनी अस्पृश्यतेविरोधात संघर्ष करीत समतेचा मूलमंत्र दिला. 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' हे प्रेरणादायी सूत्र आजही समाजात कार्यरत आहे. दलित व उपेक्षित समाजासाठी त्यांनी केलेले कार्य अतुलनीय असून समता, स्वातंत्र्य, बंधुता या तत्त्वांवर आधारित भारतीय राज्यघटना लिहिली.

उपस्थित मान्यवर

याप्रसंगी रिपाईचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे, राहुल निकाळजे, सरपंच योगेश खोटे, उपसरपंच राहुल खिलारे, शशीराव भोसले, विजय मरकड, भागवत बोराडे, पत्रकार नितीन कांबळे, पत्रकार दादा पवळ, सद्दाम शेख, राघव खिलारे, शाहरुख शेख, अन्सार शेख, फारुख शेख, दत्तात्रय खिलारे, शिवरायांचा मुस्लिम मावळा समीर शेख तसेच बौद्ध जनसेवा फाउंडेशनचे सर्व पदाधिकारी, माता-भगिनी, युवक-युवती व गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बौद्ध जनसेवा फाउंडेशनच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेऊन हा कार्यक्रम अतिशय उत्साहात यशस्वी केला.

# अम्मा असोसिएशनची नवी कार्यकारिणी जाहीर; जैविक कीटकनाशक क्षेत्रात मोठी झेप

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : सेंद्रिय शेती, संशोधन आणि शाश्वत कृषी विकासाच्या क्षेत्रात गेल्या दशकभरात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अम्मा असोसिएशनने नव्या कार्यकारिणीची घोषणा केली असून, जैविक कीटकनाशक क्षेत्रात महत्त्वपूर्ण प्रगती साधल्याचा दावा केला आहे. शेतकऱ्यांच्या सेवेसाठी ९ जैविक कीटकनाशके उपलब्ध करून देण्यात आली असून, देशातील ७ कृषी विद्यापीठे आणि ३ ICAR संशोधन संस्थांच्या सहकार्याने हे यश मिळवण्यात आले आहे. विशेषतः महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे सहकार्य या प्रकल्पात निर्णायक ठरले.

असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर वाघचौरे आणि सचिव डॉ. प्रशांत धारणकर यांच्या नेतृत्वाखाली संस्थेने संशोधन आणि प्रत्यक्ष शेती यामधील दुवा मजबूत केला आहे. डॉ. वाघचौरे यांनी ग्रामीण भागात जैविक शेतीचे महत्त्व पटवून देत विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरांवर प्रशिक्षण शिबिरे, मार्गदर्शन कार्यक्रम आणि प्रात्यक्षिके



आयोजित केली. "शाश्वत शेती हीच भविष्यातील शेती" या संकल्पनेवर आधारित काम करत त्यांनी नोंदणीकृत उत्पादने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवली आहेत.

दरम्यान, डॉ. प्रशांत धारणकर यांच्या मार्गदर्शनाखाली असोसिएशनने भारतात ९ जैविक कीटकनाशकांच्या CIB नोंदणी प्रक्रियेत महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. या प्रक्रियेमुळे सदस्य कंपन्यांना अधिकृत मान्यता मिळण्यास मदत झाली आहे.

या उपक्रमात उपाध्यक्ष डॉ. रामनाथ जगताप, डॉ. लक्ष्मण डोळे, कोषाध्यक्ष डॉ. विश्वास सोंडकर, सौ. गीता सारथे तसेच समन्वयक सौ. राखी भट्टड यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

गेल्या दशकात असोसिएशनने शेतकरी, उद्योग आणि संशोधन संस्था यांच्यात समन्वय साधत प्रयोगशाळेतील संशोधन प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवले. जैविक उत्पादनांचा प्रसार, मातीची सुपीकता वाढविणे आणि रासायनिक कीटकनाशकांवरील अवलंबित्व कमी करणे या उद्दिष्टांसाठी विविध उपक्रम राबविण्यात आले.असोसिएशनच्या उत्पादनांची माहिती देशातील निर्णयकर्त्यांपर्यंत तसेच फरीदाबाद येथील CIBRC समितीपर्यंत पोहोचवण्यात आली असून, शाश्वत शेतीच्या दृष्टीने ही उत्पादने महत्त्वाची ठरत आहेत.आगामी काळात अम्मा असोसिएशनने जिवाणूंवर आधारित ४ नवीन मिश्र जैविक कीटकनाशकांच्या नोंदणीचा संकल्प केला आहे. यासाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे आणि संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके यांच्या उपस्थितीत लवकरच उच्चस्तरीय बैठक होणार आहे. तसेच, भविष्यात असोसिएशनच्या तंत्रज्ञानावर आधारित उत्पादनांवर अधिकृत लोगो वापरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, ज्यामुळे बनावट तंत्रज्ञानावर आळा बसणार आहे.या कार्याच्या जोरावर अम्मा असोसिएशनने देशासह आंतरराष्ट्रीय स्तरावरही पाऊल टाकण्याची तयारी केली असून, रशिया, युरोप आणि मध्यपूर्वेतही ही उत्पादने निर्यात करण्याचा मानस व्यक्त करण्यात आला आहे.कृषी क्षेत्रातील या उल्लेखनीय कामगिरीबद्दल विविध मान्यवरांकडून डॉ. ज्ञानेश्वर वाघचौरे आणि त्यांच्या टीमचे कौतुक करण्यात येत आहे.

## सणसर सोसायटीच्या चेअरमन सौ .सिमावहिनी निंबाळकर यांचा कृषीमंत्री यांच्या हस्ते सत्कार




**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय** : सणसर विकास सोसायटीच्या चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल सौ.सिमावहिनी विक्रम निंबाळकर यांचा सत्कार इंदापूर तालुक्याचे आमदार व महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमात कृषिमंत्र्यांनी राज्यातील शेतकरी बांधवांना लवकरच कर्जमाफीची घोषणा होणार असल्याची माहिती चेअरमन सौ. सिमावहिनी निंबाळकर यांना दिली.

यावेळी चेअरमन सौ.सिमावहिनी निंबाळकर यांनी सणसर विकास सोसायटीच्या आगामी कामकाजा बाबत कृषिमंत्री भरणे यांना सविस्तर माहिती दिली.सणसर सोसायटीच्या विकासासाठी ठोस नियोजन,शेतकरी हिताचे निर्णय आणि पारदर्शक कामकाज यावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या सत्कार कार्यक्रमाला पुणे जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य सचिन सपकळ,कारखाना संचालक अजित नरुटे पाटील,जाचकवस्ती गावच्या सरपंच सौ.सोनाली निंबाळकर,तंटामुक्ती अध्यक्ष महेश निंबाळकर,सणसरचे माजी सरपंच राहुलभैय्या काळे,माजी चेअरमन विक्रमभैय्या निंबाळकर,रमेश निंबाळकर,व्हा.चेअरमन सचिन फुले,अशोक काळे,विलास खटके,माजी उपसरपंच अभयराजे निंबाळकर,संजय काळे,अनिकेत निंबाळकर,श्रीभैय्या निंबाळकर आदी मान्यवर तसेच सिल्वर ओकचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमातून सणसर विकास सोसायटीच्या नव्या नेतृत्वाबद्दल उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून शेतकरी बांधवांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सणसर सोसायटी सज्ज असल्याचे मत चेअरमन सौ सिमावहिनी निंबाळकर यांनी सांगितले.

# मातोश्री विद्यालयाची एच. एस. सी. बोर्ड परीक्षेत उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागांव— (यवतमाळ )** : येथील मातोश्री उच्च माध्यमिक विद्यालयाने फेब्रुवारी / मार्च 2026 मध्ये झालेल्या बोर्ड परीक्षेतघवघवीत यश संपादन केले असून उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. उच्च माध्यमिकविद्यालयाचा विज्ञान शाखेचा निकाल 100% लागला असून कला शाखेचा निकाल 98.14%




आहे. तसेच इंग्लिशमिडीयम विज्ञान शाखेचा निकाल 99.16% लागला आहे. विद्यालयातून विज्ञान व कला शाखेतून एकूण 285विद्यार्थी एच.एस.सी. बोर्ड परीक्षेस प्रविष्ट झाले होते त्यापैकी 101 विद्यार्थी विशेष प्राविण्यासह तर 134 विद्यार्थी

प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेले आहेत.उच्च माध्यमिक विज्ञान शाखेतून कु. सानिका अविनाश राऊत ही 92.67 % घेवून प्रथम तर कु. समृध्दीकिशोर ठाकरे 92.00% द्वितीय व कु. पल्लवी बालाजी केंद्रे ही 87.00% गुणासह तृतीय आली आहे. तसेचकला शाखेतून कु. संचिता गजानन बसवते हि 76.67 % गुण प्राप्त करून प्रथम आली आहे. कु. श्रध्दा संजूअढागळे ही 75.67% गुणासह द्वितीय तर कु. किरण विनोद राठोड 74.33% गुणासह तृतीय आली आहे.इंग्लिश मिडियम विज्ञान शाखेतून शिवांग विकास मुलंगे हा 89.00% घेवून प्रथम आला आहे. तर कु. अदितीपरमेश्वर बिरादार 88.83% गुणासह द्वितीय तर कु. वैदही सुधिर भांगे 88.33% गुणासह तृतीय आली आहे. सर्व यशस्वी व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे विद्यालयाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. संस्थापक डी. पी.जगताप यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# साखरपुड्याच्या कार्यक्रमासाठी जाणाऱ्या बसचा अपघात; एक गंभीर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर )** : पनवेल तालुक्यातील शिरढोण येथे रविवारी एका साखरपुड्याच्या कार्यक्रमासाठी जाणाऱ्या बसचा अपघात झाल्याची घटना घडली आहे. प्रवाशांनी भरलेली ही बस अचानक रस्त्यावर पलटी झाल्याने बसमधील प्रवासी जखमी झाले आहेत. हे सर्व प्रवासी टिटवाळा येथून माणगाव बाजूला एका साखरपुड्याच्या समारंभासाठी निघाले होते. शिरढोण परिसरात साई कृपा हॉटेल समोर ही बस पलटी झाली. अपघातानंतर परिसरात एकच खळबळ उडाली आणि स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली. जखमी प्रवाशांना तात्काळ उपचारांसाठी हलवण्यात आले असून, त्यापैकी काही जणांना पनवेलमधील उपजिल्हा रुग्णालयात दाखल



करण्यात आले आहे. तर इतर प्रवाशांना कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात भरती करण्यात आले आहे.या मध्ये एक प्रवासी गंभीर जखमी आहे. सध्या पोलीस या अपघाताचा अधिक तपास करत आहेत. दरम्यान माजी नगरसेविका नीता माळी यांनी जखमी प्रवाश्यांची भेट घेऊन त्यांची विचारपूस केली.

# कुंकवापलीकडची रमाई समाजाला कळू द्या – रोशन खोब्रागडे, सामाजिक कार्यकर्ता

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे लाखनी -** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनात "रमाई" म्हणजे फक्त पत्नी नव्हती, तर त्या संघर्षाच्या प्रत्येक पायरीवर उभ्या राहिलेल्या एक शक्ती होत्या. रमाबाई आंबेडकर यांचे आयुष्य पाहिले तर समजते की त्यांनी केवळ घर सांभाळले नाही, तर बाबासाहेबांच्या स्वप्नांना आकार देण्यासाठी स्वतःच्या आयुष्याचा त्याग केला.

आज समाजात रमाईची ओळख अनेकदा केवळ "कुंकवात" म्हणजेच पत्नी म्हणून मर्यादित ठेवली जाते. पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी उंची त्यापेक्षा खूप मोठी आहे. गरिबी, उपासमार,



अपमान आणि कठीण परिस्थितीत त्यांनी दाखवलेली सहनशीलता आणि धैर्य हेच बाबासाहेबांच्या यशामागचे अदृश्य बळ होते.

रमाईंचे जीवन म्हणजे त्याग, संयम आणि निस्वार्थ प्रेमाचा आदर्श आहे. बाबासाहेब परदेशात शिक्षण घेत असताना घरातील जबाबदाऱ्या एकटीने सांभाळणे, मुलांचे संगोपन करणे आणि कठीण परिस्थितीतही आत्मविश्वास न ढळू देणे ही रमाईंची खरी ओळख आहे.

समाजाने आता "कुंकवापलीकडची रमाई" ओळखली पाहिजे. त्या केवळ एका महान व्यक्तीची पत्नी नव्हत्या, तर त्या स्वतः एक प्रेरणास्थान आहेत. त्यांच्या त्यागाशिवाय बाबासाहेबांचे कार्य इतक्या उंचीवर पोहोचले नसते, हे सत्य आपण मान्य केले पाहिजे.

आज गरज आहे ती रमाईंच्या विचारांची आणि त्यांच्या संघर्षमय जीवनातून प्रेरणा घेण्याची. महिलांना फक्त नात्यांच्या चौकटीत न पाहता, त्यांच्या कर्तृत्वाचा आणि योगदानाचा सन्मान करण्याची हीच खरी वेळ आहे.

# लातूरच्या पाटोदा बुद्रुक ची कन्या झाली MD (आयुर्वेद), सर्व स्तरांमधून कौतुकांचा वर्षाव!!

**दैनिक युवक आधार, ता कर्जत, वैभव गायकवाड** : वैद्यकीय क्षेत्रात आल्या दिवशी प्रगती होतांना आपल्याला दिसून येते. तरी, भारतीय वैद्यकीय क्षेत्र म्हणून कित्तेक शतके आयुर्वेदाने भारतामध्ये अधिराज्य गाजविले, परंतु कालांतराने पाश्चिमात्य वैद्यकीय चिकित्सेमुळे पारंपारिक आयुर्वेद पद्धतीस लोकांनी दुर्लक्ष केले. पाश्चिमात्य रासायनिक पद्धतीच्या औषधांमुळे कालांतराने होणाऱ्या शारीरिक व्याधी लक्षात घेता व कोणतेही दुष्परिणाम होत नसल्याने पुन्हा लोकांचा कल हा पारंपारिक आयुर्वेद उपचार पद्धतीकडे वळू लागला.

याच स्थितीचा अभ्यास करून डॉक्टर स्वाती व्यंकट गवळे (बनसोडे) (राहणार- वसंत विहार, ठाणे) यांनी आयुर्वेद क्षेत्रात उंच भरारी घेऊन वरळी मुंबई येथील पोतदार मेडिकल कॉलेज येथून एम डी म्हणजेच - Doctor of Medicine In Ayurveda and Panch- karma (First Class) ही पदवी मिळवून स्वतःची एक नवीन ओळख प्राप्त केली आहे. डॉ. स्वाती यांच्याशी संवाद साधताना त्यांनी सांगितले, MD करण्यासाठी एप्रिल २०२३ रोजी पोतदार मेडिकल कॉलेज वरळी मुंबई येथे प्रवेश मिळाला. इथून पुढे मला माझ्या आयुष्यात अनेक गोष्टींचा त्याग करावा लागला, पहिला म्हणजे आपल्या आई वडिलांपासून दूर राहावे लागले. नंतर दिवसाचे १४ ते १६ तास अभ्यास करावा लागत असे. इतर मुले-मुली त्यांच्या आयुष्यात अनेक गोष्टींचे, स्वातंत्र्याचे उपभोग घेत असतांना आपल्याला मात्र तसें न करता आपल्या आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करायचे आहे अशी भावना मनात रुजविली होती. मध्यंतरीच्या काळात MD चा अभ्यास/ प्रॅक्टिस करताना एका गंभीर आजाराने ग्रासले असता, वडील व्यंकट गवळे यांनी स्वतःचे आजारपण न पाहता माझी सेवा अगदी लहान बाळाप्रमाणे केली त्याबद्दल मी माझ्या वडिलांची अत्यंत ऋणी आहे. आई छाया गवळे यांनी घराची सर्व जबाबदारी घेऊन मला खूप धीर दिला व स्वतःकडे लक्ष देऊन आपल्या ध्येयाकडे लक्ष केंद्रित करावयास प्रोत्साहन दिले. बहीण विश्वांजली व कोमल तसेच भाऊ विशाल यांनी पाठराखण केली.

तसेच पती चेतन बनसोडे यांनी सुद्धा लग्न झाल्यानंतर अभ्यासाकरिता दूर राहावे लागणार आहे हे माहित असतांना देखील कोणतीही तक्रार न करता माझा आधारस्तंभ होऊन माझ्या पाठीशी खंबीर उभे राहिले. माझ्या अभ्यासावर कोणताही ताण त्यांनी येऊ दिला नाही, त्यामुळे त्यांचेदेखील मी विशेष आभार व्यक्त करते. माझ्या या संपूर्ण परिवाराने माझ्याकरिता जो त्याग केला तो अतुलनीय आहे त्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार व्यक्त करते.कॉलेज मधील शिक्षक व सहविद्यार्थी यांचा देखील महत्वाचा वाटा माझ्या आयुष्यात राहिला आहे. हॉस्टेल मध्ये एकाच खोलीत तब्बल तीन वर्ष परिवारापासून दूर आपल्या मैत्रिणींसोबत राहावे लगत असे, हे तीन वर्ष त्या सर्वांनी माझा परिवार म्हणूनच मला मोलाची साथ दिली त्याबद्दल त्यांचेही आभार व्यक्त करणे अनिवार्य आहे.

अगदी एप्रिल (२०२६) महिन्याच्या शेवटी हा सोनेरी दिवस उजाडला आणि मला कॉलेज तर्फे माझ्या सर्व त्यागाचे, अभ्यासाचे आणि माझ्या मेहनतीचे फळ म्हणून एम डी पदवी बहाल करण्यात आली. ही पदवी मी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अर्पण करत असून आज त्यांच्याच आशीर्वादामुळे एक स्त्री म्हणून समाजात अभिमानाने वावरू शकते. आता उर्वरित पुढील संपूर्ण आयुष्य डॉक्टर या रूपाने जनतेच्या सेवेकरीता अर्पण करून आई वडिलांचे स्वप्न साकार करण्याकरिता प्रयत्न करणार आहे. माझ्या वडिलांची पुण्याई आणि त्यांचा माझ्याप्रति असलेला विश्वास त्यास मी पात्र ठरले, अशी भावना डॉ. स्वाती यांनी व्यक्त केली.डॉ. स्वाती गवळे यांच्या वडिलांशी (व्यंकट धोंडिबा गवळे) संवाद साधला असता, "माझ्या मुलीने माझ्या आयुष्याचं चीज केलं" अशी अत्यंत भावुक आणि एका वाक्यात आपली भावना व्यक्त केली. आई छाया यांनी आनंदाने उर भरून आल्याची भावना व्यक्त केली. आम्हाला आमच्या मुलीचा सार्थ अभिमान आहे असे अगदी सन्मानाने सांगत होते.गवळे परिवारातील तसेच पाटोदा बुद्रुक (लातूर) मधील पहिली आयुर्वेद एम डी डॉक्टर म्हणून, सामाजिक स्तरातून व घरातील सर्व नातेवाईक तसेच आप्तेष्ट यांच्याकडून डॉ. स्वाती यांचे भरभरून कौतुक केले जात आहे. बनसोडे परिवारातर्फे डॉ. स्वाती यांचे विशेष स्वागत देखील करण्यात आले. मित्रपरिवार व अनेक सामाजिक संघटनांद्वारे डॉ. स्वाती यांचे कौतुक केले जात आहे.ही आनंदवार्ता संपूर्ण समाजाकरिता एक प्रेरणा देणारी व अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. एक मुलगी, एक पत्नी, एक स्त्री कोणत्याही क्षेत्रात मागे राहू शकत नाही व आपली वेगळी ओळख निर्माण करू शकते यात कोणतेही दुमत नाही हे मात्र खरे आहे.

# मादळमोही येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर संपन्न

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाच्या वतीने मादळमोही येथे दिनांक १ मे २०२६ रोजी "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान"उत्साहात संपन्न झाले. या शिबिरात नागरिकांच्या विविध महसुली समस्या व अडचणींचे निराकरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.श्री.आ. श्री विजयसिंह पंडित विधानसभा सदस्य गेवराई हे होते. प्रमुख अतिथी म्हणून तहसीलदार मा श्री संदीपजी खोमने ,तालुका कृषी अधिकारी मा श्री.सचिन गिरी, गटविकास अधिकारी मा.श्री अनिरुद्ध जी सानप ,वैद्यकीय अधिकारी लोकरे साहेब तसेच मा.श्री राजेंद्र वारंगे ,मा.श्री ज्ञानेश्वर नवले,मा. श्री दीपक वारंगे,मा.श्री.पवन गावडे ,मा श्री.माऊली तळेकर मा.श्री.संदीप आंधळे तसेच शासनाच्या सर्व विभागाचे विभाग विभाग प्रमुख यांची उपस्थिती होती.




यावेळी तहसीलदार साहेबांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले ,सर्व शेतकऱ्यांनी एकमेकांची अडवणूक न करता सर्वांनी सहकार्य करून सर्वांनी आपली प्रगती साधावी असे आव्हान केले.तालुका कृषी अधिकारी साहेब यांनी शेतकऱ्यांना पोखरा योजनेविषयी व अन्य योजनेची माहिती दिली व जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा फायदा घ्यावा असे आव्हान केले.शिबिरामध्ये विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. नागरिकांच्या अर्जांवर तत्काळ कार्यवाही करून मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमास ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली असून आयोजनाबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले.

# व्यावसायिक एलपीजी (LPG) सिलिंडर किमतीचा भडका : लोकशाहीतील 'महागाईचे राजकारण' उघडे पडले!

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : मे 2026 च्या पहिल्याच दिवशी व्यावसायिक एलपीजी सिलिंडरचा दर थेट ₹ 3024 वर पोहोचतो आणि एका झटक्यात ₹ 993 ची प्रचंड वाढ नोंदवली जाते. त्याचा विचार करताना आपल्याला दरवाढ पद्धतीचा मागोवा सुद्धा घ्यावा लागेल तेव्हा हे चित्र जास्त स्पष्ट होईल.

2000 ते 2014 च्या कालखंडाचा विचार केला असता आपल्याला लक्षात येईल की 500 रुपये चे सिलेंडर 1500 रुपयांचे झाले म्हणजे 14 वर्षात 1000 रुपये वाढले.

आणि 1 जानेवारी 2026 ते 2 मे 2026 या 5 महिन्यात हा दर 1691 वरून 3071 झाला म्हणजेच तब्बल 1380 रुपयांची वाढ झाली. 14 वर्षात 1000 रुपये वाढ कुठे आणि 5 महिन्यात 1380 रुपये वाढ कुठे?

काँग्रेस काळात 150 रुपये च्या आसपास सिलेंडर किंमत वाढल्यावर भाजप पक्षाने स्मृती इराणी यांच्या नेतृत्वात मोठे आंदोलन केले होते. तसेच भाजप सरकार असताना महाविकास आघाडी च्या पाठिंब्यामुळे खासदार झालेल्या नवनीत राणा यांनी चुलीवर स्वयंपाक करून आंदोलन केले होते.आज वाढत्या किमतीवर दोघेही चूप आहेत. कारण त्या दोघीही भाजप सोबत आहेत आणि केंद्रात भाजप सरकार आहे.

अशी सत्ता 4बघुन भूमिका घ्यावी की जनसामान्यांच्या काळजीने सत्तेचा 6विचार न करता लोककल्यानात्मक भूमिका घ्यावी?

भारतीय अर्थव्यवस्थेतील अस्थिरता, धोरणात्मक अपयश आणि राजकीय प्राधान्यक्रमांचे उघड चित्र आहे. हे नैसर्गिक बाजारचक्राचे परिणाम नसून दूरदृष्टीचा अभाव असणारे,नियोजनशून्यतेचे लक्षण आहे.यात जनतेच्या सहनशीलतेची परीक्षा घेतली जात आहे.आज मूलभूत प्रश्न उभा राहतो—निवडणुकांच्या काळात दर स्थिर राहतात आणि निवडणुका संपताच महागाईचा स्फोट का होतो? जर अर्थव्यवस्था खरोखरच मुक्त बाजारपेठेवर आधारित असेल, तर ही विसंगती कशी समजावून सांगायची? यावरून हे स्पष्ट होते की, महागाई ही केवळ आर्थिक घटना नसून ती "व्यवस्थापित" केली जाणारी राजकीय प्रक्रिया बनली आहे.

२०१४ नंतर 'लाभार्थी मतदार' ही संकल्पना भारतीय राजकारणात ठळकपणे पुढे आली. विविध कल्याणकारी योजनांमुळे तात्पुरता दिलासा मिळाला, पण त्यातून मतदारांमध्ये अवलंबित्वाची मानसिकता निर्माण झाली. नागरिक म्हणून प्रश्न विचारण्याऐवजी मतदार "मला काय मिळाले?" या चौकटीत अडकू लागला. यामुळे लोकशाहीतील जवाबदेही कमकुवत झाली. सत्ताधाऱ्यांसाठीही दीर्घकालीन आर्थिक सुधारणा करण्याऐवजी तात्पुरत्या लाभांवर भर देणे अधिक सोयीचे ठरले. लोकशाहीची खरी ताकद ही प्रश्न विचारणाऱ्या मतदारात असते. जो शासनाच्या निर्णयांवर शंका घेतो, आकडे तपासतो आणि उत्तरांची मागणी करतो, तोच लोकशाहीला बळकट करतो. परंतु लाभार्थी मानसिकतेमुळे ही प्रवृत्ती कमी होत चालली आहे. परिणामी, महागाई, बेरोजगारी आणि आर्थिक विषमता यांसारखे गंभीर प्रश्न दुय्यम ठरतात आणि सत्तेला उत्तरदायित्व टाळणे सोपे जाते. ज्या लोकप्रतिनिधींनी यावर आवाज उचलायला पाहिजे ते स्वतःची कातडी वाचवणे आणि मलाई मिळविण्यात लक्ष केंद्रित करतात. जर आंतरराष्ट्रीय परिस्थितीवर जर इंधनाच्या किंमती अवलंबून असतील तर निवडणुका होईपर्यंत त्या वाढत का नाही? निवडणूक झाल्या बरोबर का वाढतात? हे समजायला फार बौद्धिक क्षमतेची गरज नसून थोड्या राजकीय भूमिका समजून घेण्याची गरज असते. काहीही करून मतदार तुटला नाही पाहिजे, सत्ता अबाधित राहिली पाहिजे, मतदार म्हणजे "काम सरो नी वैद्य मरो " अशी नजर सत्ताधाऱ्यांची असते.

दुसरीकडे, शिक्षणाचा प्रसार वाढत असला तरी राजकीय साक्षरतेचा अभाव स्पष्टपणे जाणवतो. उच्च शिक्षण घेतलेल्या व्यक्तींमध्येही आर्थिक धोरणांचे विश्लेषण करण्याची सवय कमी दिसते. नागरिकत्व, संविधान आणि सार्वजनिक धोरणांविषयीची सखोल समज निर्माण होत नाही. त्यामुळे माहिती असूनही सजग मतदार तयार होत नाही.

जर मतदार खरोखरच जागरूक असता, तर एलपीजी दरातील अशी प्रचंड वाढ सहज स्वीकारली गेली नसती. निवडणुकीपूर्वी दिलेल्या आश्वासनांची काटेकोर पडताळणी झाली असती. "अच्छे दिन" सारख्या घोषणांवर ठोस प्रश्न उपस्थित झाले असते. सजग मतदार दीर्घकालीन परिणामांचा विचार करतो, पण त्याचा अभाव दिसून येतो.

जागतिक पातळीवर पाहिल्यास भारताची स्थिती अजूनही विकसित राष्ट्रांच्या तुलनेत मागे आहे. अमेरिका आणि चीनसारख्या अर्थव्यवस्थांशी तुलना करता भारताला अजून मोठा पल्ला गाठायचा आहे. अशा परिस्थितीत 2047 पर्यंत विकसित देश होण्याचे स्वप्न आकर्षक असले तरी त्यासाठी आवश्यक असलेली धोरणात्मक सातत्य, आर्थिक स्थैर्य आणि रोजगारनिर्मिती यावर ठोस प्रगती आवश्यक आहे. अन्यथा, हे स्वप्न केवळ घोषणांपुरतेच मर्यादित राहील. आजच्या राजकारणात घोषणांचा पूर आलेला आहे—"विकसित भारत 2047", "विश्वगुरू भारत", "अच्छे दिन". परंतु घोषणांइतकीच महत्त्वाची असते ती त्यांची अंमलबजावणी. घोषणा करणे सोपे असते, पण त्यासाठी दीर्घकालीन जबाबदारी स्वीकारणे कठीण असते. जर घोषणा करणारे वयामुळे भविष्यात जिवंत असतील तर राजकारणात तरी सक्रिय नसतील, तर त्या आश्वासनांची जबाबदारी ही त्यांची राहणार नाही. आणि जे सत्तेत राहतील ते धर्मासाठी, देशरक्षणासाठी , विकासासाठी , शेतकरी,दिव्यांगासाठी पक्ष बदलला म्हणुन विधाने करतात तशाच प्रकारची लोकांना महामूर्ख समजून काही विधाने करतील आणि जबाबदारी नाकारतील.

आज भारतीय लोकशाही एका निर्णायक टप्प्यावर उभी आहे. एका बाजूला लाभार्थी राजकारण, भावनिक मुद्दे आणि तात्पुरत्या सवलती आहेत; तर दुसऱ्या बाजूला शाश्वत विकास, आर्थिक स्थैर्य आणि जागरूक नागरिकत्व आहे. या दोन मार्गांपैकी योग्य निवड करण्याची जबाबदारी प्रत्येक मतदारावर आहे.

व्यावसायिक एलपीजीच्या किमतीतील ही प्रचंड वाढ आपल्याला एक स्पष्ट संदेश देते—लोकशाही केवळ मतदानाने जिवंत राहत नाही; ती जिवंत राहते सजग, प्रश्न विचारणाऱ्या आणि धाडसी नागरिकांमुळे. आज गरज आहे घोषणांवर आंधळा विश्वास ठेवण्यापेक्षा वास्तव समजून घेण्याची, लाभार्थी बनण्यापेक्षा जबाबदार नागरिक बनण्याची आणि सत्तेला निर्भयपणे प्रश्न विचारण्याची. हाच खरा लोकशाहीचा आत्मा आहे.

**डॉ. प्रशांत विघे**
**राजकीय विश्लेषक तथा सिनेट सदस्य, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती**
**9326877749**

## नागपूर : विदर्भ त्वचारोग सोसायटीची नवीन कार्यकारिणी जाहीर

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राकेश यादव वाडी**

**नागपूर** : विदर्भ डर्मेटोलॉजिकल सोसायटी (VIDS) तर्फे 2026-27 या वर्षासाठी नवीन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. हॉटेल तुली इम्पीरियल, रामदासपेठ येथे आयोजित पदग्रहण समारंभात डॉ. सुशील पांडे यांनी अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली, तर डॉ. सतीश उड्डुकर यांनी सचिवपदाची जबाबदारी स्वीकारली.




या कार्यक्रमास इंदिरा गांधी मेडिकल कॉलेजच्या त्वचारोग विभागाच्या प्रमुख डॉ. विद्या खाकर या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तसेच ज्येष्ठ त्वचारोगतज्ज्ञ डॉ. जयंत लोखंडे यांनी विशेष अतिथी म्हणून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नंदिता गाडे आणि डॉ. हेमल बजाज यांनी केले.

नवीन कार्यकारिणीत डॉ. रूपा अडतिया व डॉ. पुष्पा आर्य यांची उपाध्यक्षपदी, डॉ. संदीप अग्रवाल व डॉ. ईशा अग्रवाल यांची संयुक्त सचिवपदी, तर डॉ. सौम्य जेवलकर यांची कोषाध्यक्षपदी निवड करण्यात आली. कार्यकारिणी सदस्य म्हणून डॉ. जयेश मुठी, डॉ. नितीन लोढा, डॉ. निलेश महाते, डॉ. शरदक देशमुख, डॉ. नीलम काकोड, डॉ. सुमित जाजू, डॉ. प्रज्ञा आम्बटकर, डॉ. हेमल बजाज, डॉ. सुमित हजारे व डॉ. ओमकार बानाजी यांचा समावेश आहे.

विदर्भातील विविध जिल्ह्यांसाठी समन्वयक म्हणून डॉ. विवेक जैन (गोंदिया), डॉ. शरद रानडे (वर्धा), डॉ. अंशु चांडक (अमरावती), डॉ. सागर टाकले (अकोला), डॉ. वीणा बन्सोड (चंद्रपूर), डॉ. साईनाथ पाटीलकर (बुलढाणा) आणि डॉ. भूषण मडके (यवतमाळ) यांची नियुक्ती करण्यात आली.

या प्रसंगी मागील वर्षातील अध्यक्ष डॉ. आसरा झुंजारो व सचिव डॉ. प्रियंका मानधने यांचा त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल सत्कार करण्यात आला.कार्यक्रमांतर्गत आयोजित शैक्षणिक सत्रात "पिग्मेंटरी डिसऑर्डर्स" विषयावर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. डॉ. विद्या खाकर यांनी क्लिनिकल स्वरूपांवर सविस्तर माहिती दिली, तर डॉ. विक्रम सावजी यांनी उपचारपद्धतींबाबत मार्गदर्शन केले. तसेच पिग्मेंट व्यवस्थापनावर पॅनल चर्चेचे आयोजन करण्यात आले.

विदर्भातील विविध भागांतील त्वचारोगतज्ज्ञांच्या उत्स्फूर्त सहभागात हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमाच्या वैज्ञानिक दर्जा आणि उत्कृष्ट आयोजनाबद्दल सर्वत्र कौतुक व्यक्त करण्यात आले.

## आदिवासी समाजातून बारावी परीक्षेत लवेश ने मारली बाजी

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी, नागपूर :** उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे द्वारा घेण्यात आलेल्या 12 वी च्या शालांत परीक्षेत अतुलेश इंग्लिश कॉन्व्हेंट ज्युनिअर कॉलेज, नागपूर येथील लवेश प्रदीप वरखडे याने शेड्युल ट्राइब वर्गवारीतून 90% गुण मिळवून सोसायटी तसेच कुटुंबीयांचे नाव रोशन केले. लवेश च्या यशाचे सर्वत्र कौतुक होत असून त्याच्या



पुढील उज्वल भविष्यासाठी त्याला शुभेच्छा दिल्या जात आहे.


## बुद्ध पौर्णिमेनिमित्त महाप्रज्ञा बुद्ध विहारात धम्माची जागृती - बुद्धिजीवी वर्गाला आवाहन

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे लाखनी -** लाखनी येथील महाप्रज्ञा बुद्ध विहारात २५७० व्या बुद्ध पौर्णिमेनिमित्त अत्यंत भक्तीभावाने आणि उत्साहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सकाळी आठ वाजता धम्म ध्वजारोहण, वंदना ग्रहण करून भगवान बुद्धांना अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. पुरण लोणारे यांनी आपल्या प्रभावी भाषणात सांगितले की, धम्म माणसाला सदाचार आणि नैतिकता शिकवतो. पंचशीलाचे पालन केल्यास व्यक्तीच्या जीवनात शुद्धता आणि शांती निर्माण होते. त्यांनी पुढे दहा पारमितांचे महत्त्व स्पष्ट करताना शील, दान, उपेक्षा, सत्य, नेख्खम्म, वीर्य, क्षांती, करुणा, अधिष्ठान आणि मैत्री या गुणांमुळेच जग बुद्धाच्या विचारांकडे आकर्षित होत असल्याचे सांगितले.

डॉ. लोणारे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विज्ञाननिष्ठ धम्म संकल्पनेचा उल्लेख करत बुद्धिजीवी वर्गाने धम्माचा अंगीकार करून त्याचा व्यापक प्रसार करावा, असे आवाहन केले.यावेळी



धम्ममंचावर उपस्थित भंते धम्मघोष (नागपूर) यांनी धम्मदेशना देत आजच्या अस्थिर जगात युद्ध नव्हे, तर प्रेम, सत्य आणि शांतीचा संदेश देणाऱ्या भगवान बुद्धांची गरज असल्याचे प्रतिपादन केले. याच विचाराला सुरेंद्र बनसोड यांनीही दुजोरा दिला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रेवाराम खोब्रागडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन विठ्ठल गणवीर यांनी मानले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांना खीरदान करण्यात आले.या प्रसंगी गजेंद्र गजभिये, डॉ. सुरेश खोब्रागडे, रोशन खोब्रागडे, विनोद रामटेके, आशीष गणवीर, विना डोंगरे, सदानंद वासनिक, जयप्रकाश टेंभुर्णी, प्रा. बाळकृष्ण रामटेके, सूरज बागडे, वी. जी. कांबळे, किशोर बनसोड, रमेश भोयर, नामदेव काणेकर, वर्षा तिरपुडे, कमल गणवीर, साधना शिंगाडे, नलिनी ढवळे, सुमन काणेकर, अक्षरा खोब्रागडे यांच्यासह शेकडो उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. एकंदरीत, बुद्ध पौर्णिमेच्या निमित्ताने धम्म, शांती आणि मानवतेचा संदेश देणारा हा कार्यक्रम प्रेरणादायी ठरला.

## चित्रपट सृष्टीत चर्चा फक्त "राजा शिवाजी" चित्रपटाची!!!

**दैनिक युवक आधार**

**ता कर्जत / वैभव गायकवाड :** १ मे रोजी महाराष्ट्र दिन सर्वत्र उत्साहात आणि आनंदात साजरा झाला. त्यांचसोबत आंतरराष्ट्रीय कामगार दिवस व बुद्धपौर्णिमा देखील उत्साहात संपन्न झाली. परंतु आता सर्वत्र चर्चा आहे ती, रितेश विलासराव देशमुख दिग्दर्शित "राजा शिवाजी" या मराठी चित्रपटाची. तसे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर कैक चित्रपट आपण सर्वांनीच पहिले आहेत तरी, विशेष म्हणजे रितेश देशमुख यांनी स्वतः छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका राजा शिवाजी या चित्रपटात साकारली आहे. तसेच त्यांची पत्नी जेनीलिया देशमुख यांनी देखील चित्रपटात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्नी ची (सईबाईंची) भूमिका साकारली आहे. याच सोबतीला मुख्य खलनायकाच्या भूमिकेत म्हणजेच अफजल खान चे पात्र हे संजय दत्त यांनी साकारले. तसेच वरिष्ठ कलावंत महेश मांजरेकर व सचिन खेडेकर तसेच जितेंद्र जोशी, अशोक समर्थ, सिद्धार्थ जाधव यांनी देखील उत्तम अभिनय सादर केला. रितेश यांचे बंधू धीरज देशमुख यांनी देखील चित्रपटात लहान भूमिका निभावली. या चित्रपटाचे लेखन प्राजक्त देशमुख, रितेश देशमुख व संदीप पाटील यांनी केलं आहे.

हिंदी सिनेसृष्टीतील अनेक दिग्गज कलाकार या मराठमोळ्या चित्रपटात रितेश यांनी खेचून आणले. यामध्ये अभिषेक बच्चन, फरदीन खान, भाग्यश्री, अमोल गुप्ते, बोमन इराणी, विद्या बालन अश्या पट्टीच्या कलाकारांचा समावेश दिसला. सलमाम खान यांची विशेष भूमिका चित्रपटात सर्वांचे लक्ष वेधून घेते. त्यांनी जिवा महाला हे पात्र साकारले आहे. अजय अतुल यांच्या पार्श्वसंगीताने चित्रपट आणखीनंच बाहरला आहे. सुरेल मराठी आणि हिंदी गाणी चित्रपटामध्ये घेण्यात आली आहेत.

चित्रपट पडद्यावर येण्याआधी अनेक जणांनी समाज माध्यमाद्वारे रितेश यांना ट्रोल करण्याचा प्रयत्न केला, परंतु प्रत्यक्षात जसा चित्रपट प्रदर्शित झाला तसे सर्वांच्या तोंडून रितेश, जेनीलीया आणि त्यांच्या मुलांचे भरभरून कौतुक होऊ लागले आहे. या सर्व कलाकारांनी अतिशय उत्तम अभिनय सकाराला आहे. शिवाजी महाराजांच्या प्रवित्र प्रतिमेस कोणताही धक्का न लावता अतिशय सुंदर आणि लक्षवेधी असा अभिनय सर्व कलाकारांनी केला आहे. सोशल मीडियावर रितेश यांना ट्रोल करणाऱ्यांना चांगलीच चपराक बसली आहे. चित्रपट प्रदर्शनावेळी रितेश व जेनीलिया दोघेही भावुक होतांना दिसले. अनेक वर्षांपासून चे रितेश यांचे हे स्वप्न १ मे २०२६ रोजी साकार झाले अशी भावना दोघांनीही व्यक्त केली. सलग सुट्या आल्यामुळे प्रत्येक थिएटर मध्ये चित्रपट पाहण्यासाठी लोकांची एकच गर्दी होऊ लागली आहे. अगदी लहान मुलांपासून ते वयोवृद्धांपर्यंत प्रत्येक जण आवर्जून हजेरी लावत आहेत व तितक्याच उत्साहानं प्रशंसा देखील करत आहेत. हा चित्रपट बनविण्याकरिता तब्बल १०० कोटींच्या वर खर्च आल्याचं बोलले जात आहे तर चित्रपट ५०० कोटींपेक्षा जास्त ची कमाई करेल असा अंदाज बांधला जात आहे. तरी बॉक्सऑफिस वर हा मराठमोळा चित्रपट ह्या वर्षी नक्कीच बाजी मारणार हे निर्विवाद आहे.

## नांदरून येथे विविध उपक्रमांनी बुद्ध जयंती उत्साहात साजरी; कॅण्डल रॅलीने गाव उजळले

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी** : नांदरून येथे तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. सकाळपासूनच गावात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

यावेळी बुद्ध वंदना, धम्मपाठ, विचार प्रबोधन कार्यक्रम तसेच इतर आयोजन सुद्धा करण्यात आले. गावातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत बुद्धांच्या



शिकवणीचा जागर केला.

संध्याकाळी गावातून भव्य कॅण्डल रॅली काढण्यात आली. या रॅलीत युवक, महिला व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. "बुद्धं शरणं गच्छामि"च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. रॅलीमुळे गावात शांतता, बंधुता आणि समतेचा संदेश देण्यात आला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संदीप रायबोले अशोक रायबोले अविनाश रायबोले उमेश रायबोले श्रीकृष्ण रायबोले दिनेश रायबोले लक्ष्मण रायबोले रामदास रायबोले विद्याधर रायबोले तसेच महिला सुद्धा मोठया संख्येने उपस्थित होत्या आचल रायबोले राजेश्री रायबोले अर्चना रायबोले ललिता रायबोले कमला रायबोले सुनीता रायबोले वंदना वानखडे सुधाबाई रायबोले पदमा रायबोले व नागरिकांनी ग्रामस्थ व युवकांनी विशेष परिश्रम घेतले



# सुरगाणा महाविद्यालयात महाराष्ट्र दिन उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र टोपले, सुरगाणा :** महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय सुरगाणा येथे प्राचार्य डॉ चंद्रकांत दिघावकर यांच्या उपस्थितीत ६६ वा महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे कार्यालयिन अधिक्षक श्री. राजेंद्र शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ चंद्रकांत दिघावकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की महाराष्ट्र राज्य हे पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते.१ मे १०६०. रोजी महाराष्ट्र राज्य स्थापन झाले संयुक्त महाराष्ट्र चळवळ हा लढा दिला गेला त्यात अनेक नेत्यांनी योगदान दिले असे सांगितले.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार डॉ. संतोष पवार यांनी केले.यावेळी कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. विजय अहिरे, प्रा.सुरेश भोये, डॉ. चंद्रकांत पाटील, डॉ.रविंद्र हिरे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.



# सासरच्या पाठबळावर माधुरी नाठे यांची भरारी; महसूल सहाय्यकपदी निवड

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी** :- निफाड तालुक्यातील चांदोरी येथील सासरकडून मिळालेल्या भक्कम पाठबळाच्या जोरावर माधुरी निवृत्ती नाठे यांनी महसूल सहाय्यक पदावर निवड होत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

सून नव्हे, तर मुलगी मानत सासरच्या मंडळींनी त्यांच्या शिक्षणाला आणि स्पर्धा परीक्षेच्या तयारीला दिलेली साथ आज अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. माधुरी यांचे माहेर सिन्नर तालुक्यातील पाटोळे येथे असून त्या शेतकरी कुटुंबात वाढल्या. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण त्यांनी गावातच पूर्ण केले. आई वनिता खताळे यांनी मजुरी करून, तर वडील वाळीबा कृष्णा खताळे यांनी शेती करत



मुलांच्या शिक्षणासाठी अहोरात्र कष्ट घेतले. प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी शिक्षणाची ओढ कायम ठेवली.

नाशिक येथे डिप्लोमा शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांचा विवाह चांदोरी येथील निवृत्ती दिलीप नाठे यांच्याशी झाला. विवाहानंतर त्यांच्या आयुष्याला नवे वळण मिळाले. पती निवृत्ती नाठे हे भारतीय सैन्यात कार्यरत असून,

> **“माझ्या सासूबाईंनी मला कधीच सून म्हणून वागवलं नाही; त्यांनी नेहमी मुलगी म्हणूनच जपलं. पती, सासू-सासरे, भाऊजी व जाऊबाई यांनी माझ्या स्वप्नांना आपलं मानून प्रत्येक कठीण प्रसंगी माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. त्यांच्या विश्वास, प्रेम आणि पाठबळामुळेच आज मी हे यश संपादन करू शकले.”**
>
> **– माधुरी नाठे**

देशसेवेबरोबरच पत्नीच्या स्वप्नांनाही त्यांनी तितकेच महत्त्व दिले. “तू अभ्यास कर, पुढे जा” हा त्यांचा विश्वास माधुरींसाठी मोठी ताकद ठरला.

सासूबाई सुमन नाठे, सासरे दिलीप नाठे, भाऊजी सोपान नाठे व जाऊ अनुराधा नाठे यांनीही त्यांना मुलीसारखी माया देत अभ्यासासाठी आवश्यक वातावरण निर्माण केले. त्यांच्या साडेचार वर्षांच्या मुलगा स्वरूपची जबाबदारी कुटुंबाने स्वीकारल्याने माधुरी यांना निश्चिंतपणे अभ्यास करता आला.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातून बी.टेक. (पॉलिमर) पदवी पूर्ण केल्यानंतर त्यांनी एमपीएससीची वाट निवडली. पुण्यात राहून त्यांनी कठोर परिश्रम घेतले. दोन वेळा अपयश आल्यानंतरही त्यांनी हार मानली नाही.

नाशिक येथील संत ज्ञानेश्वर अभ्यासिकेत ऑनलाइन मार्गदर्शन घेत तिसऱ्या प्रयत्नात त्यांनी महसूल सहाय्यक पदावर यश मिळवले.

# बांधकाम कामगारांच्या समस्या सुटणार का? पालकमंत्र्यांकडे करण्यात आली न्यायाची मागणी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी विजय खुडे** : जिल्ह्यातील हजारो बांधकाम कामगार गेल्या अनेक महिन्यांपासून आपल्या हक्काच्या लाभापासून वंचित असून, प्रशासकीय दिरंगाईमुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी राष्ट्रवादी कामगार विभागाच्या वतीने पालकमंत्र्यांची भेट घेऊन प्रशासनाच्या आडमुठ्या धोरणाचा पाढा वाचण्यात आला. प्रमुख समस्या आणि मागण्या:

कामगार विभागाच्या कार्यालयात चकरा मारूनही कामगारांच्या पदरी निराशाच पडत आहे. निवेदनात खालील मुख्य मुद्द्यांवर प्रकाश टाकण्यात आला आहे:

नोंदणी प्रलंबित: मार्च २०२५ पासून नवीन कामगारांची नोंदणी प्रक्रिया जाणीवपूर्वक रखडवण्यात आली आहे.

नूतनीकरणाचा खोळंबा: सप्टेंबर २०२५ पासून नूतनीकरणाचे अर्ज धूळ खात पडून आहेत, ज्यामुळे कामगारांचे 'सक्रीय' स्टेटस धोक्यात आले आहे.

लाभापासून वंचित: एप्रिल २०२५ पासून मंजूर झालेले आणि प्रलंबित असलेले लाभाचे दावे (कल्याणकारी योजनांचे पैसे) अद्याप कामगारांच्या खात्यावर जमा झालेले नाहीत.

प्रशासकीय टाळाटाळ: कामगार अधिकारी नियमानुसार काम न करता गरिबांच्या घामाचा पैसा अडवून धरत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

जोपर्यंत न्याय नाही, तोपर्यंत लढा सुरूच राहणार!

"कामगारांच्या हक्काचे पैसे अडवणे हे अन्यायकारक आहे. सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवूनही जर कामगारांना न्याय मिळत नसेल, तर हा लढा अधिक तीव्र केला जाईल," असा इशारा यावेळी पदाधिकाऱ्यांनी दिला. पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी या प्रश्नी सकारात्मक चर्चा करून संबंधित विभागाला सूचना देण्याचे आश्वासन दिले आहे.

**यावेळी उपस्थित पदाधिकारी:**

■ कामगार विभागाचे अनेक प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते:

■ नाझीम रजवी (उपाध्यक्ष, महाराष्ट्र अल्पसंख्याक विभाग)

■ शेख अफजल (जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी कामगार विभाग, हिंगोली)

■ राहुल मेसाजी खंदारे (जिल्हा उपाध्यक्ष, राष्ट्रवादी कामगार विभाग, हिंगोली)

■ महारुद्र सवणे (तालुका अध्यक्ष, राष्ट्रवादी कामगार विभाग, कळमनुरी)

■ सिद्दीकी आदिलोदिन (तालुका सचिव, राष्ट्रवादी कामगार विभाग, कळमनुरी)

■ देवराव वाघमारे (तालुका अध्यक्ष, राष्ट्रवादी कामगार विभाग, औंढा)

# स्वगणनेचा पहिला टप्पा सुरू; पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत जिल्हास्तरीय शुभारंभ !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे अकोला :** जनगणना हे राष्ट्रीय कार्य आहे. नागरिकांनी दिलेल्या अचूक माहितीवर पुढील 10 वर्षांसाठी जिल्ह्याच्या शाळा, दवाखाने, रस्ते, पाणीपुरवठा योजना, रेशन व्यवस्था व इतर विकासकामांचे नियोजन अवलंबून आहे. त्यामुळे नागरिकांना स्वगणना करून अचूक माहिती द्यावी, तसेच प्रगणकांनाही सहकार्य करावे, असे आवाहन राज्याचे कामगार मंत्री तथा अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी केले.

राष्ट्रीय जनगणना कार्यक्रमाचा जिल्हास्तरीय शुभारंभ व कार्यक्रमाच्या अनुषंगाने पत्रकार परिषद पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात झाला, त्यावेळी ते बोलत होते. प्र. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, पोलीस अधिक्षक अर्चित चांडक, निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे आदी यावेळी उपस्थित होते.

राष्ट्रीय जनगणना कार्यक्रमात स्वगणनेचा टप्पा 1 मे पासून 15 मेपर्यंत चालेल. त्यानंतर प्रगणकांमार्फत दिनांक 16 मे ते 14 जुन 2026 या कालावधीत घरोघरी जाऊन माहिती संकलन केली जाणार आहे. ही प्रक्रिया अत्यंत सुलभ व डिजीटल करण्यात आली आहे. नागरिक स्वतः मोबाईलद्वारे माहिती भरू शकतात. जनगणना कायदा 1948 नुसार नागरिकाची वैयक्तिक माहिती 100 टक्के गोपनीय राहील. ती कोणत्याही न्यायालयीन किंवा महसुली कामासाठी वापरली जात नाही. त्यामुळे प्रत्येकाने ही प्रक्रिया पूर्ण करून आपले राष्ट्रीय कर्तव्य पूर्ण करावे, असे आवाहन पालकमंत्र्यांनी यावेळी केले.

अकोला जिल्ह्याने नेहमीच शासकीय उपक्रमात पुढाकार घेतला आहे. डिजिटल जनगणनेतही आपला जिल्हा महाराष्ट्रात अव्वल राहील, असा मला विश्वास आहे. 'आपली नोंद, आपला विकास' हे ब्रीद लक्षात ठेवून सर्व नागरिकांनी स्व-गणना करावी व प्रगणकांना सहकार्य करावे. जनजागृतीसाठी माध्यमांची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण असून, या कार्यासाठी माध्यमांनी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले. जिल्हाधिकारी श्री. स्वामी यांनी जनगणना कार्यक्रमाचे टप्पे, मनुष्यबळ आदी माहिती दिली. महापालिका आयुक्त श्री. लहाने यांनीही शहरातील कार्यक्रम, मनुष्यबळ आदी माहिती दिली. श्री. मालठाणे यांनी आभार मानले.

# त्रिविध बुद्ध पौर्णिमेनिमित्त गुरढा येथे भव्य सामाजिक उपक्रम रक्तदान व नेत्रतपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे** लाखनी - त्रिविध बुद्ध पौर्णिमेच्या पावन निमित्ताने सम्यक बुद्ध विहार, समता भूमी गुरढा येथे विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला स्थानिक तसेच बाहेरील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९.१५ वाजता भारतीय बौद्ध परिषद सर्कल कनेरी/द. (६० गावे) चे प्रभारी अध्यक्ष जयेंद्र देशपांडे यांच्या हस्ते पिंपळ वृक्ष, तथागत भगवान बुद्ध आणि बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून, अगरबत्ती व मेणबत्ती प्रज्वलित करत ध्वजारोहणाने करण्यात आली.

यानंतर महामाया धम्म संगोष्टी ग्रुपच्या उपासिकांनी आपल्या मधुर वाणीतून त्रिसरण, पंचशील, धम्मदेशना आणि बुद्ध गीत सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. संपूर्ण परिसरात धम्ममय वातावरण निर्माण झाले होते.सामाजिक बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या नेत्रतपासणी शिबिरात सुमारे १६० जेष्ठ नागरिकांनी लाभ घेतला, तर रक्तदान शिबिरात अनेक रक्तदात्यांनी



उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यामध्ये किशोरभाऊ वाढई, राहुल बनसोड, रक्षक गोंडाणे, सोनु मेश्राम यांचा समावेश होता.

विशेष म्हणजे, सामाजिक कार्यात नेहमी पुढाकार घेणारे जयेंद्र देशपांडे यांनी स्वतः ३१ वेळा रक्तदान करून ‘रक्तवीर’ म्हणून आपली ओळख अधोरेखित केली. दिवसभर खिरदान व अल्पोपहाराचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गावकरी, तरुण वर्ग तसेच बाहेरगावाहून आलेल्या नागरिकांनी मोलाचे सहकार्य केले.

कार्यक्रमाच्या शेवटी सम्यक बुद्ध विहार समता भूमी गुरढा येथील सर्व बौद्ध उपासक-उपासिकांनी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानत साधुवाद व्यक्त केला. धम्म, सेवा आणि सामाजिक एकात्मतेचा संगम साधणारा हा कार्यक्रम प्रेरणादायी ठरला.

# नालंदा नगरातील बँक कॉलनीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले व भगवान बुद्ध यांची संयुक्त जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**नागपूर, प्रतिनिधी :** सामाजिक समता सप्ताहाच्या निमित्ताने नालंदा नगर येथील बँक कॉलनी प्रांगणात जयंती उत्सव समिती, बँक कॉलनी सोसायटीच्या वतीने क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भगवान बुद्ध यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त प्रेरणादायी कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. समाजप्रबोधन, समता, मानवता आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा संदेश देणारा हा कार्यक्रम परिसरातील नागरिकांसाठी विशेष आकर्षण ठरला.

कार्यक्रमाची सुरुवात बुद्ध वंदना आणि प्रवचनाने झाली. वंदनीय भंते यांनी भगवान बुद्धांच्या विचारांचे महत्त्व सांगत समाजात शांतता, करुणा आणि समतेचा संदेश दिला.

यावेळी त्यागमूर्ती रमाई भीमराव आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित हृदयस्पर्शी लघुनाटिका सादर करण्यात आली. रमाई यांच्या भूमिकेत शोभा गौतम पाटील यांनी प्रभावी अभिनय साकारला, तर बाबासाहेबांच्या भूमिकेत इंजी. गौतम पाटील यांनी उपस्थितांची मने जिंकली. या सादरीकरणाने उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू तरळले.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्यकारिणी सदस्य रामभाऊ डोंगरे सर यांनी अंधश्रद्धा, बुवाबाजी आणि चमत्काराच्या नावाखाली सामान्य लोकांची होणारी फसवणूक यावर प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. वैज्ञानिक





दृष्टिकोन स्वीकारण्याचे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.कार्यक्रमाला महा. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे ज्येष्ठ पदाधिकारी चित्तरंजन चौरे सर, नरेश महाजन सर, पुष्पा घोडके, वर्षा टेंभेकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मा. दिवाकर साखरे यांनी “बाबासाहेबांनी घडवलेले मानवतावादी परिवर्तन” या विषयावर प्रभावी प्रबोधन करत उपस्थितांना विचारांची नवी दिशा दिली. तसेच त्यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन करून वातावरण अधिक प्रेरणादायी केले.

या कार्यक्रमाला बँक कॉलनी परिसरातील ज्येष्ठ सभासद, महिला-पुरुष, युवक-युवती तसेच सामाजिक कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

शंभराहून अधिक नागरिकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी दीपा बागडे, गीतांजली मानके, मिताली गेडाम तसेच मित्र-मैत्रिणींनी अथक परिश्रम घेतले.समता, बंधुता, मानवता आणि वैज्ञानिक विचारांचा संदेश देणारा हा कार्यक्रम नालंदा नगर परिसरात विशेष चर्चेचा विषय ठरला.

# द. ग. तटकरे महाविद्यालय तळा येथे पदवी प्रदान समारंभ उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**तळा प्रतिनिधी :** तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय, तळा येथे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ व २०२४-२५ मधील यशस्वी विद्यार्थ्यांसाठी पदवी प्रदान समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात नुकताच संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या स्वागत मिरवणुकीने झाली.या समारंभाचे अध्यक्षस्थान संस्थेचे अध्यक्ष श्री. पुरुषोत्तम गो. मुळे यांनी भूषविले. कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नानासाहेब यादव यांनी प्रास्ताविकातून महाविद्यालयाच्या प्रगतीचा, शैक्षणिक गुणवत्ता वृद्धीचा व विद्यार्थ्यांच्या यशाचा आढावा सादर केला. संस्थेचे खजीनदार श्री चंद्रकांत रोडे विद्यार्थ्यांना म्हणाले की, आता तुमच्यासमोर नवीन संधी आणि आव्हाने उभी आहेत. आपल्या कर्तृत्वाने, प्रामाणिकपणाने आणि मेहनतीने तुम्ही तुमचे भविष्य उज्ज्वल कराल, याची मला खात्री आहे. सचिव महेंद्रशेठ कजबजे यांनी आपल्या महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल करणे ही आपली जबाबदारी असून आपल्या महाविद्यालयास कधीही विसरू नये असे आवाहन केले. डॉ दत्ता कुंटेवाड व डॉ, तृप्ती थोरात यांनी पदवीधर विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यासाठी वाचन केले. अध्यक्षीय भाषणात श्री. पुरुषोत्तम गो. मुळे यांनी विद्यार्थ्यांना जीवनात प्रामाणिकपणा, परिश्रम व शिस्त यांचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी विद्यार्थ्यांनी समाजाभिमुख दृष्टीकोन ठेवून पुढे जाण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे विश्वस्त श्री मारुती शिर्के, श्री विठ्ठल जोशी, उपाध्यक्ष श्री पुरुषोत्तम मुळे, सचिव श्री महेंद्रशेठ कजबजे, खजिनदार श्री चंद्रकांत रोडे, शाळा समितीचे चेअरमन श्री श्रीराम कजबजे, प्राथमिक विद्यामंदिरचे चेअरमन श्री महादेव बैकर, सदस्य श्री दिपक कोटिया, श्री चंद्रकांत खातू आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे निवेदन डॉ भगवान लोखंडे तर आभार डॉ तृप्ती थोरात यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या समारंभामुळे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला गेला असून, हा दिवस त्यांच्या स्मरणात कायमचा राहील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी दर्यापूर तालुका सोशल मीडिया तालुकाप्रमुखपदी जगदीश कांबे यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी** : महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने दर्यापूर तालुका सोशल मीडिया विभागाच्या तालुकाप्रमुखपदी जगदीश कांबे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्षांच्या मान्यतेने जिल्हा काँग्रेस कमिटीने नुकतेच नियुक्तीचे पत्र कांबे यांना प्रदान केले.

अनुभवी चेहऱ्यावर पुन्हा विश्वास

जगदीश कांबे यांनी यापूर्वीही ही जबाबदारी अत्यंत यशस्वीपणे पार पाडली आहे. त्यांच्या मागील कार्यकाळात



फेसबुक, व्हॉट्सॲप, इन्स्टाग्राम आणि ट्विटर या माध्यमांतून पक्षाची ध्येय-धोरणे, शासनाच्या लोककल्याणकारी योजना आणि स्थानिक प्रश्नांवरची भूमिका प्रभावीपणे मांडली गेली. बूथ पातळीपर्यंत डिजिटल नेटवर्क उभे करून संघटनात्मक बांधणीला बळकटी देण्याचे काम त्यांनी केले होते.

त्यांचा दांडगा जनसंपर्क, तांत्रिक बाबींची जाण आणि आक्रमक मांडणी कौशल्य पाहता पक्षश्रेष्ठींनी पुन्हा एकदा त्यांच्यावर विश्वास दाखवला आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही नियुक्ती महत्त्वाची मानली जात आहे.

**अभिनंदनाचा वर्षाव**

नियुक्तीची बातमी येताच दर्यापूर तालुका काँग्रेस कमिटी, युवक काँग्रेस, महिला काँग्रेस, सेवादल व एनएसयुआयच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जगदीश कांबे यांचे अभिनंदन केले. तालुकाध्यक्ष, जिल्हाध्यक्ष तसेच वरिष्ठ नेत्यांनी दूरध्वनी करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना जगदीश कांबे म्हणाले, "पक्षाने माझ्यावर पुन्हा जो विश्वास टाकला, त्याबद्दल मी वरिष्ठ नेत्यांचा आभारी आहे. सोशल मीडिया हे आजच्या काळातील प्रभावी हत्यार आहे. खोट्या माहितीला आळा घालून पक्षाची सत्य भूमिका, राहुल गांधीजींचे विचार आणि काँग्रेसचा जनकल्याणकारी अजेंडा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे हे माझे प्राधान्य असेल. प्रत्येक बूथवर डिजिटल योद्धा तयार करून संघटना मजबूत करू."

**कार्यकर्त्यांमध्ये उत्साह**

कांबे यांच्या नियुक्तीमुळे तालुक्यातील युवक कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य संचारले आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून केंद्र व राज्य सरकारच्या अपयशावर बोट ठेवताना स्थानिक पातळीवरील प्रश्नांना वाचा फोडली जाईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

दरम्यान, लवकरच तालुका कार्यकारिणीची बैठक घेऊन पुढील रणनीती ठरवली जाणार असल्याचे कांबे यांनी सांगितले. त्यांच्या पुढील वाटचालीस सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# शालार्थ आयडी घोटाळा प्रकरणी नांदेड मधील सन २०२० ते २२ च्या शिक्षक भरतीवर एसआयटी ची विशेष नजर

**दैनिक युवक आधार**

**किशोर गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख** : मुंबई-शिक्षक भरती व त्यातून निर्माण झालेला शालार्थ आयडी घोटाळा राज्यात गाजत असताना नांदेड जिल्ह्यातील सन २०२० ते २०२२ पर्यंत तत्कालीन नांदेडचे शिक्षणाधिकारी बाळासाहेब कुंडगीर यांच्या मान्यतेने झालेल्या शिक्षक भरतीवर एसआयटी समितीची विशेष नजर असून याची सखोल चौकशी चालू असल्यामुळे शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

शालार्थ आयडी घोटाळा व त्यातून हजारो नियमबाह्य झालेली शिक्षक भरती उघड होत असल्यामुळे शालार्थ आयडी घोटाळा राज्यभर गाजत आहे. या घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी शासनाने एसआयटी समितीची स्थापना केली व त्या समितीच्या माध्यमातून चौकशी सुरू झाल्यावर एका-एका जिल्ह्याचे शालार्थ आयडी घोटाळ्याचे प्रकरण उघड होत आहेत. या समितीचे अध्यक्ष विभागीय आयुक्त पुणे डॉ.चंद्रकांत पलकुंडवार व सदस्य अति. पोलीस महासंचालक डॉ. मनोज शर्मा हे कर्तव्यदक्ष व कडक असल्यामुळे शालार्थ घोटाळ्याची चौकशी एसआयटी समिती सखोल व पारदर्शक करत आहे. आता या एसआयटी समितीची नजर नांदेडच्या शिक्षक भरती वर गेली आहे. सन २०१२ नंतर नियुक्त झालेल्या शिक्षक भरतीच्या संचिकेची व शालार्थ आयडीची चौकशी होतच आहे. पण विशेष करून सन २०२० ते २०२२ पर्यंतच्या शिक्षक भरती मान्यतेच्या व त्यांच्या दीड- दोन वर्षानंतर मंजूर झालेल्या शालार्थ आयडी च्या संचिकांची चौकशी एसआयटी समितीचे पथक सखोल करत आहेत .सन २०१८ते २०२१ पर्यंत नांदेडला माध्यमिक विभागाला बालासाहेब कुंडगीर हे शिक्षणाधिकारी होते व ते ३१ जानेवारी २०२१ ला सेवानिवृत्त झाले. त्यांनी पदावर असताना धुमधडाक्यात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मंजुऱ्या दिल्या. ते निवृत्त झाल्यावर नांदेड मधील काही संस्था चालकांनी मागील तारखेत त्यांची सही करून शिक्षकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मंजूर करून घेतल्या . व नंतर दिड-दोन वर्षांनी त्यांचे शालार्थ आय डी चे प्रस्ताव तत्कालीन शिक्षणाधिकारी प्रशांत दिग्रसकर यांचेसी संगणमत करून मंजूर करून घेतलेत .ही बाब एसआयटी पथकाच्या प्राथमिक तपासणीत समितीच्या लक्षात आली. व अशा शिक्षकांचे आवक-जावक क्रमांक शिक्षण विभागातील रजिस्टरला जुळत नाहीत व त्यांच्या संचीकाही शिक्षण विभागात सापडत नाहीत. कुंडगीर सेवानिवृत्त झाल्यावर त्यांच्या सह्या असलेल्या पाचशेच्या जवळपास शिक्षक नियुक्त्यास व २०० च्या जवळपास शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या असल्याची चर्चा शिक्षण क्षेत्रातील उलाढाल करणाऱ्या रति महारथी मध्ये होत आहे .तसेच समितीच्या सखोल चौकशीमुळे सन २०२० ते २०२२ मधील मंजुरी असलेल्या शिक्षकांत व संस्थाचालकात एकच खळबळ माजली.

# खालापूर तालुक्यात आरोग्य व्यवस्थेला चालना-सभापती कृष्णाशेठ पारंगे व जि.प.सदस्या नेहा पारंगे यांचा उपकेंद्रांना दौरा

**दैनिक युवक आधार**

**रसायनी (आनंद पवार)** : खालापूर तालुक्यातील आरोग्य सेवांचा दर्जा उंचावण्यासाठी खालापूर पंचायत समितीचे सभापती कृष्णाशेठ पारंगे आणि वासांबे येथील जिल्हा परिषद सदस्या सौ.नेहा पारंगे यांनी(शनिवार दि.२४ एप्रिल) रोजी रीस,मोहोपाडा व वासांबे येथील उपकेंद्रांना प्रत्यक्ष भेट देत कामकाजाचा सखोल आढावा घेतला.




दौऱ्यादरम्यान दोन्ही मान्यवरांचे उत्स्फूर्त स्वागत करून पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी त्यांनी आरोग्य सुविधांना भेडसावणाऱ्या विविध समस्या,अडचणी व आव्हानांची बारकाईने माहिती घेतली. दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या प्रश्नांवर तातडीने तोडगा काढण्याचे ठोस आश्वासन देत प्रशासनाला गती देण्याचे संकेत दिले.

रीस उपकेंद्राच्या पुनर्बांधणीची तातडीची गरज अधोरेखित करत मोहोपाडा उपकेंद्राच्या दुरुस्तीबाबत सकारात्मक भूमिका घेतली.सध्या मोहोपाडा येथे कार्यरत असलेल्या वासांबे उपकेंद्रासाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून नवीन इमारत उभारण्याचा निर्णय त्यांनी जाहीर केला. तसेच उपकेंद्र स्तरावरील रिक्त असलेली CHO व इतर पदे लवकरात लवकर भरली जातील,असे स्पष्ट केले. अनेक भौतिक अडचणी असूनही रीस उपकेंद्राने केलेल्या उल्लेखनीय कार्याचे त्यांनी विशेष कौतुक करत कर्मचाऱ्यांचा उत्साह वाढवला.

यानंतर प्राथमिक आरोग्य केंद्र लोहोप येथेही त्यांनी भेट दिली. येथे पंचायत समिती सदस्या सौ.गौरी गडगे यांच्या उपस्थितीत स्वागत सोहळा पार पडला.स्वच्छता,उत्कृष्ट टीमवर्क आणि कार्यपद्धतीबाबत लोहोप प्राथमिक आरोग्य केंद्राचे सर्वत्र कौतुक करण्यात आले. रायगड जिल्ह्यात प्रथमच मिळालेल्या NQAS राज्यस्तरीय प्रमाणपत्रामध्ये सर्वाधिक गुण मिळवत यश मिळवणे आणि कायाकल्प स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावणे ही बाब विशेष उल्लेखनीय ठरली.यावेळी सौरऊर्जेवर आधारित ऑन-ग्रिड व ऑफ-ग्रिड प्रणाली,तसेच पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील बिर्ला कार्बन कंपनी,श्री.समर्थ सामाजिक विकास सेवाभावी संस्था आणि एमजीएम रुग्णालय,कामोठे यांच्या सहकार्याने सुरू असलेल्या विशेष ओपीडी सेवांचेही त्यांनी मनापासून कौतुक केले.

भविष्यात लोहोप प्राथमिक आरोग्य केंद्र अधिक सक्षम करण्यासाठी परिचारिका,सुरक्षा रक्षक व शिपाई पदांची भरती तसेच आवश्यक औषधी साहित्य उपलब्ध करून देण्याचे आश्वासन देण्यात आले.संपूर्ण दौऱ्या दरम्यान तालुका आरोग्य अधिकारी डॉ.कल्याणी इंगोले, आणि वैद्यकीय अधिकारी डॉ.मंगेश देशमुख,खालापूर पंचायत समितीच्या प्रशासकीय कर्मचारी वर्षा हजारे,श्री समर्थ सेवाभावी सामाजिक विकास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अरविंद पाटील,महादेव गडगे,रसायनी टाइम्सचे संपादक अनिल भोळे पत्रकार आनंद पवार,बी. एस. कुलकर्णी यांच्यासह प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रातील अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.एकूणच या दौऱ्यामुळे खालापूर तालुक्यातील आरोग्य व्यवस्थेला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# धमाल विनोदी आणि प्रबोधन करणारे किशोर पाटील यांचे नाटक "गोष्ट धमाल गावाची"

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख /एम.डी.भोईर** : नाट्य संस्कृती आणि नाट्य परंपरेचा वारसा जतन व्हावा आणि गावाचं गावपण टिकावं या उद्देशाने उरण तालुक्यातील पिरकोन या गावी *श्री शिवशंकर नाट्य मंडळाने दरवर्षीप्रमाणे या वर्षी दिनांक ३० एप्रिल २०२६ रोजी* कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाच्या भव्य प्रांगणात *"गोष्ट धमाल गावाची"* या नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग जवळपास दोन ते अडीच हजार नाट्य रसिक प्रेक्षकांच्या उपस्थितीत दणक्यात सादर केला .



लेखक, दिग्दर्शक श्री किशोर पाटील यांचे अतिशय गाजलेले नाटक *"हाल्या मारतय ह्येलपाटा"* या नाटकाला महाराष्ट्र राज्य नाट्य मंडळाकडून तीन पुरस्कार मिळाल्यानंतरचे पुढील नाटक म्हणजे *"गोष्ट धमाल गावाची".* हे नाट्यपुष्प प्रत्यक्ष लोकांच्या , नाट्यप्रेमी व नाट्यरसिकांच्या पसंतीस उतरले.

आपल्याअवतीभोवतीच्या सामाजिक समस्यांवर हसता हसता चिमटे काढणारे किशोर पाटील लिखित दिग्दर्शित दोन अंकी अस्सल आगरी बोली भाषेतील रसाळ नाटक रसिकांच्या पसंतीस उतरल्याने उपस्थितांनी मनमुराद आनंद लुटला.लेखन,दिग्दर्शन,व नाटकातील अभिनय या तिन्ही भूमिकांमध्ये स्वतः श्री.किशोर पाटील व त्यांच्या सहचारिणी सौ.जोत्स्ना पाटील हे युगल* नेहमीप्रमाणेच लोकांच्या पसंतीस उतरले असून नाटकातील इतर कलाकारांनी अभिनयातील आपलं कसब पणाला लावून ही नाट्यकलाकृती सादर केल्यामुळे सर्वांनीच कलाकारांचे मनापासून कौतुक केलं .

या शुभारंभाच्या सोहळ्याच्या *अध्यक्षपदी मा.श्री प्रितम म्हात्रे साहेब माजी विरोधी पक्षनेता पनवेल महानगरपालिका ,उद्घाटक मा. श्री संजय शिंदे साहेब इन्वेस्ट लँडसिटी सीएमडी, विद्यमान सभापती मा. श्री महेश म्हात्रे साहेब पं.स.उरण, डॉ.अरुणकुमार भगत स्विकृत सदस्य पनवेल महानगरपालिका,साहित्यरत्न तथा कोकण मराठी साहित्य परिषद जनसंपर्कप्रमुख प्रा. एल.बी.पाटीलसर, साहित्यिक ए.डी पाटील सर, मा. श्री सुधाकर पाटील साहेब माजी अध्यक्ष दहागाव संघ, मा. श्री जीवन गावंड साहेब माजी जिल्हा परिषद सदस्य , समाजभूषण मा.श्री. मुकुंद गावंड उपाध्यक्ष उरण तालुका भाजपा,मा. श्री कृष्णा पाटील अध्यक्ष दहागाव माजी विद्यार्थी संघ पिरकोन, मा.सौ प्रारंभी गावंड सदस्या पं.स.उरण, मा.सौ. कविता रुपेश पाटील सदस्या पं. स. उरण, मा.सौ कलावती पाटील मॅडम विद्यमान सरपंच,पिरकोन,शिक्षक नेते मा.श्री नरेश मोकाशीसर,* मा.डॉ.सुभाष घरत धाकटीजुई,मा .श्री सुरेश पाटील, चिरनेर जिल्हाचिटणीस शेकाप, मा.श्री रमाकांत पाटील माजी पं. स. सदस्य उरण, मा.श्री.रमाकांत जोशी माजी सरपंच पिरकोन,मा. श्री.अनंत गावंड, चेअरमन पंचरत्न इंग्लिश मिडियम स्कूल पिरकोन, मा.श्री.अनुरुद्ध पाटील व मा.श्री.अनिल पाटील उपाध्यक्ष दहागाव विद्यार्थी संघ पिरकोन तसेच या सोहळ्यासाठी परिसरातील आजी-माजी सरपंच, सामाजिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा व शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली.

नाटकाचे नृत्य दिग्दर्शन व रंगवेषभूषा मा.श्री. अमृत म्हात्रे कोप्रोली, प्रकाश योजना श्री. मिलिद गावंड, नेपथ्य श्री. पार्थिव पाटील व साऊंड सिस्टीम श्री.ध्रुवा पाटील कोप्रोली यांनी पाहिले.

श्री शिवशंकर मंडळाचे निर्माता मा.श्री.शेखर पाटील आणि अध्यक्ष श्री.राजेंद्र गावंड यांनी मंडळाची परंपरा 40वर्षे जपली आहे. या संपूर्ण नाट्य सोहळ्याचे बहारदार *सूत्रसंचालन श्री.विलास गावंड सर व श्री.जगदिश गावंड सर* पिरकोन यांनी ओघवत्या वाणीने करून उपस्थितांची वाहवा मिळवली.

# इयत्ता बारावी निकाल २०२६ : भारतीय महाविद्यालयाचा घवघवीत यशकिर्तीचा ठसा, विज्ञान शाखेचा ९७.६७% निकाल

**दैनिक युवक आधार**

**अमरावती** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (पुणे) यांच्यामार्फत फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. या निकालात राजापेठ येथील भारतीय महाविद्यालय, अमरावती यांनी यंदाही उल्लेखनीय यश संपादन करत आपल्या गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. महाविद्यालयाचा एकूण निकाल २२.०५ टक्के लागला असला, तरी विज्ञान शाखेने तब्बल ९७.६७ टक्के निकाल लावत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

महाविद्यालयाच्या विविध शाखांनुसार पाहता विज्ञान शाखा आघाडीवर असून कला शाखेनेही ८७.५० टक्क्यांसह समाधानकारक कामगिरी केली आहे. वाणिज्य शाखेचा निकाल ५२.६३ टक्के, तर एमसीव्हीसी विभागाचा निकाल ७२.७० टक्के लागला आहे. या सर्व निकालांमुळे महाविद्यालयातील शैक्षणिक दर्जा आणि विद्यार्थ्यांच्या परिश्रमाचे प्रतिबिंब स्पष्टपणे दिसून येते.



यंदाच्या निकालात विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्य मिळवत गुणवत्तेची उंची गाठली आहे. आर्या प्रदीप सांगले हिने ८८.६७ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला, तर तनुश्री विनोद शेबे (८७.१७%) आणि तनुश्री राजेंद्र काळेकर (८३%) यांनी अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक मिळवला. पियुष सुमेध गजभिये (८१.८३%), श्रावणी दीपक सातवकर (८०.८३%) आणि समृद्धी मनोहर भुते (७९.६७%) यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले.

कला शाखेत अदिती प्रकाश कुकडे हिने ६८.६७ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. दिव्या आर. वायधने (६८%) आणि गौरव एम. श्रीवास्तव (६३.८३%) यांनी अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक पटकावला. वाणिज्य शाखेत जानवी मुकेश टाले हिने ६५ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला.

या यशामध्ये सामाजिक समावेशकतेचेही दर्शन घडते. पियुष सुमेध गजभिये याने अनुसूचित जाती प्रवर्गातून ८१.८३ टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश मिळवले, तर अदिती प्रकाश कुकडे हिने दिव्यांग प्रवर्गातून ६८.६७ टक्के गुण मिळवत कला शाखेत प्रथम क्रमांक मिळवला. त्यामुळे महाविद्यालयाने गुणवत्तेसोबतच समावेशक शिक्षणाची परंपरा जोपासल्याचे दिसून येते.

महाविद्यालयाच्या या यशाबद्दल भारतीय विद्या मंदिर संस्थेच्या अध्यक्षा तथा प्राचार्या डॉ. आराधना वैद्य यांनी आनंद व्यक्त करत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांची चिकाटी, प्राध्यापकांचे समर्पित मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळेच हे यश शक्य झाले असल्याचे त्यांनी नमूद केले. "विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनतीने महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे. त्यांच्या पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा," असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले.

यावेळी प्राचार्यांनी कला शाखेच्या प्रा. लता वैद्य, विज्ञान शाखेच्या प्रा. रुपाली भागवतकर आणि वाणिज्य शाखेचे डॉ. सुशील गावंडे यांच्यासह सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विशेष कौतुक केले. तसेच प्रा. नेहा वर्मा, प्रा. अंकिता नाहे, प्रा. दीक्षा मेश्राम, प्रा. हेमंत बेलोकार, प्रा. संतोष घासले, प्रा. स्वप्निल वानखडे आदी प्राध्यापकांनीही यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

एकूणच, भारतीय महाविद्यालयाने यंदाच्या बारावी निकालात विशेषतः विज्ञान शाखेत दमदार कामगिरी करत आपली शैक्षणिक परंपरा अधिक बळकट केली असून, भविष्यातही अशाच यशाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# कामगार दिनानानिमित्त पत्रकार मित्र असोसिएशनतर्फे श्रमविरांचा सन्मान सोहळा संपन्न

## लहान–मोठ्या क्षेत्रातील कामगारांचा करण्यात आला सन्मान

**दैनिक युवक आधार**

**पनवेल / प्रतिनिधी** : पत्रकार मित्र असोसिएशनतर्फे दिनांक १ मे रोजी महाराष्ट्र दिन आणि आंतरराष्ट्रीय कामगार दिनानिमित्त विविध क्षेत्रांतील कामगारांचा सत्कार करून त्यांच्या योगदानाचा सन्मान पत्रकार मित्र असोसिएशन संस्थेतर्फे करण्यात आला. यामध्ये औद्योगिक कामगार, कचरा वेचक, सुरक्षारक्षक आणि घरेलू कामगार, गॅस सिलेंडर वाहक यांसारख्या लहान-मोठ्या क्षेत्रातील कामगारांचा पत्रकार मित्र असोसिएशनतर्फे कामगार दिनाचे औचित्य साधून सन्मान करण्यात आला. यावेळी कामगार क्षेत्रातील अनेक कामगार नेते तसेच कामगारांसाठी आयुष्यभर झटणाऱ्या नामांकित मंडळींना श्रमविर सन्मान पुरस्कार देऊन त्यांचा यथाशक्तीप्रमाणे गौरव करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते व चर्मकार तसेच गटई कामगारांसाठी आपले आयुष्य खर्ची घालणारे शिवदास कांबळे यांनी आपल्या कार्याचा आलेख भाषण करताना मांडला व कामगार दिनाचे महत्व समजावून संगितले तसेच म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनचे सरचिटणीस अनिल जाधव व उपस्थितांनी कामगार दिनानिमित्त प्रबोधनकारक भाषण केले व कार्यक्रमाबद्दल आयोजकांचे आभार व्यक्त केले. पत्रकार मित्र असोसिएशनचे




संस्थापक केलेलं महाडिक यांनी यावेळी उपस्थितांसमोर कामगार क्षेत्रात झालेला बदल, कामगार संघटनांना लागलेले वेगळे वळण, तसेच महापालिकेतील कर्मचाऱ्यांची आजची अवस्था, पनवेल महापालिकेत आजहि अग्निशामक दलाच्या जवानांना न मिळालेले फायर सूट किट याबाबत मत व्यक्त करून बदल घडवावा अशी विनंतीही उपस्थित नेत्यांना केली. सदर कार्यक्रमास शिवदास कांबळे, म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनचे सरचिटणीस अनिल जाधव, धर्मवीर कामगार सेनेच्या अध्यक्षा प्रियांकाताई गाडे, उद्योजक वैभव ढवळे, डॉ. पल्लवी पाटील, स्त्री शक्ती फाउंडेशनच्या अध्यक्षा विजया कदम, सुप्रसिद्ध डॉक्टर श्रुणाल जाधव, पत्रकार मित्र असोसिएशनचे संस्थापक केवल महाडिक, अध्यक्ष प्रोफेसर एस. क्रिष्णकुमार, कार्याध्यक्ष नितीन जोशी, सहसचिव प्रवीण शेंडे, खजिनदार राजन शेलार, ग्रामीण अध्यक्ष शशिकांत दळवी, निखिल गुंदेचा यांच्यासह सदस्यवर्ग उपस्थित होते.

# राष्ट्रीय महामार्गाची दुरावस्था !

## विलंबामुळे कोट्यावधी रूपयाचा अतिरिक्त भुर्दंडाची शक्यता !

**दैनिक युवक आधार**

**शिरूर कासार प्रतिनिधी** : शिरूर कासार दि. २ (रामकिसन कातखडे, युवक आधार प्रतिनिधी) २०१८ मधे मंजुरी मिळून अठरा महिण्यात काम पूर्ण होणे बंधनकारक असले तरी तब्बल आठ वर्षाचा कालावधी लोटला असुन अजुनही ते पुर्णत्वास गेले नसल्याने शासनाला किमान २८ कोटीचा अतिरिक्त भुर्दंडाची झळ बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राजुरी नवगण--खरवंडी कासार हा राष्ट्रीय महामार्ग ३६१ नंबरचा शिरूर तालुक्यातूही देखील जात आहे . आजही याचे काम अनेक ठिकाणी अपुर्णच असल्याने वाहन चालक शेतकऱ्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे .नांदेड -लोहा -खरवंडी -पाथर्डी



मार्गे अहिल्यानगरला जोडणारा हा महामार्ग पुणे -मुंबई साठी अंतर कमी म्हणून वेळेत वाचवणारा महत्वाचा दुवा मानला जातो .या महामार्गासाठी लोकप्रतिनीधीसह माजी मुख्य अभियंता दिगंबर मळेकर यांनी राज्य व केंद्र सरकार कडे सतत पाठपुरावा करून मंजुरी मिळवली होती.₹२७६.९५ कोटी रूपयाचे अंदाजपत्रकाला मान्यता देण्यात आली होती. भूसंपादन, झाडतोड, पाईपलाईन दुरूस्ती तसेच दुकान व मालमत्ता भरपाईसाठी ₹३४.४८ कोटीचा अंतर्भाव होता .

मात्र संबधीत कत्राटदाराने नियोजीत मुदतीत काम पूर्ण न केल्याने प्रकल्प रखडला. नवगण राजुरी , जांब , ब्र . वेळंव , भालगांव , मुंगसवाडे आदी गावातून रस्त्याची लांबीची कामे अपूर्ण आहेत . राजुरी पुलाचे कामही दीर्घकाळ प्रलंबीत असल्याने अडथळा आणि अपघाताला कारणीभुत ठरत आहे . आता सुधारीत अंदाज ₹३०२ .८७ कोटी पर्यंत गेला आहे . तसा प्रस्ताव केंद्रिय कार्यालयाकडे सहा महिण्यापासुन प्रतिक्षेत आहे . मंजुरीनंतरच कामाला गती मिळेल . नविन दरवाढीचा ₹ २८ कोटी चा अर्थिक भार सोसावा लागणार , अनेक ठिकाणी रस्ता उखडला गेला , कॉंक्रिट कामाला तडे गेले , पावसाळ्यात चिखल , उन्हाळ्यात धूळीचा सामना करतांना आरोग्य देखील धोक्याच्या उंबरठ्यावर आहे . या महामार्गावरील महाअडथळे तातडीने दूर करून काम उत्तम दर्जाचे व्हावे अशी मागणी सर्व स्तरातून केली जात आहे . दळववळणासाठी महत्वपूर्ण असलेल्या महामार्गाची ही चित्तरकथा वेदनादायक असुन सुधारीत अंदाजपत्रकास ताबडतोब मान्यता देऊन उर्वरीत गांवच्या शेतकऱ्यांना मावेजा देऊन कामाला गती देण्यात यावी व त्यात असलेल्या तृटीत देखील सुधारणा करावी असे मत सेवानिवृत्त मुख्य अभियंता दिगंबर मळेकर यांनी व्यक्त केले .

# भुसावळातील कर्तव्यदक्ष पोलीस हवालदार सुरज पाटील यांचा पोलीस महासंचालक पदकाने सन्मानित

**दैनिक युवक आधार जळगाव**
**जिल्हा प्रतिनिधी समाधान पाटील** : भुसावळ पोलीस उपअधीक्षक कार्यालयातील कर्तव्यदक्ष पोलीस हवालदार सुरज पाटील यांचा महाराष्ट्र दिनानिमित्त पोलीस महासंचालकांचे पदक लावून जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील तसेच जिल्ह्याचे नूतन पोलीस अधीक्षक श्रीकांत धीवरे यांच्याहस्ते सन्मानित करण्यात आले.

त्यांची उत्कृष्ट कामगिरीची दखल घेऊन त्यांनी मुंबई पोलीस दलातून सेवा बजावून 2007 साली जळगाव जिल्ह्यात बदली करून आलेल्या सुरज पाटील यांनी गेल्या 20 वर्षांपासून जिल्हा पोलीस दलात सेवा दिली त्यांनी आतापर्यंत एमआयडीसी, एलसीबी, जळगाव, भुसावळ पोलीस उपअधीक्षक कार्यालयात सेवा बजावली त्यांनी विविध गुन्ह्यांचा तपास करताना चोरी, घरफोडी, दरोडा, मर्डर तसेच फसवणूक सारखे गुन्हे उघडकीस आणले त्यांच्या या कामगिरीची विशेष दखल घेऊन त्यांना महासंचालक पदक जाहीर करण्यात आले व त्यांना महाराष्ट्र दिनाच्या दिवशी जळगाव जिल्ह्याचे पालक मंत्री गुलाबराव पाटील, व जळगाव जिल्ह्याचे पोलीस




अधीक्षक श्रीकांत धीवरे यांच्याहस्ते त्यांना सन्मानीत करण्यात आले.

व पूर्ण जिल्ह्याभरातून त्यांचे अभिनंदन करण्यात आले . व त्यांना भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देण्यात आले

# खांदेश–मराठवाडा जोडणाऱ्या रस्त्याची दयनीय अवस्था; तात्काळ दुरुस्तीची मागणी, आंदोलनाचा इशारा

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : सोयगाव तालुक्यातील गोंदेगाव येथील नागरिकांनी राज्य रस्ता क्रमांक ४८ व ४०नाचनवेल ,शेल गाव,घाटनांद्रा,बोरमाळ,तिडका,वर ठाण, गोंदेगाव,पाचोरा या महत्त्वाच्या मार्गाची अवस्था अत्यंत खराब झाली असून, तात्काळ नूतनीकरण व दुरुस्ती करण्याची मागणी ग्रामस्थ व वाहनधारकांकडून करण्यात येत आहे. या संदर्भात मा.मुख्यमंत्री, मंत्रालय मुंबई यांना निवेदन देण्यात आले आहे.हा रस्ता खांदेश व मराठवाडा विभागांना जोडणारा प्रमुख मार्ग असून,सध्या अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. विशेषतःघाट परिसरातील घसरडे व धोकादायक वळणांमुळे अपघाताचा धोका मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. या मार्गावरून दररोज विद्यार्थी, शेतकरी, रुग्ण तसेच सर्वसामान्य नागरिक प्रवास



करतात, त्यामुळे त्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे.पावसाळ्यात या रस्त्याची स्थिती अधिकच बिकट होत असून,अनेक वेळा वाहतूक पूर्णपणे बंद राहते. त्यामुळे नागरिकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागतो. काही प्रकरणांमध्ये रुग्णांना वेळेवर उपचार न मिळाल्याने जीवितहानी झाल्याच्या घटना देखील घडल्या आहेत.या समस्येबाबत यापूर्वीही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना, तसेच आमदार व खासदारांना वारंवार निवेदने देण्यात आली आहेत.विविध वर्तमानपत्रे व न्यूज चॅनल्सनीही या रस्त्याची दुरवस्था अधोरेखित केली आहे.मात्र,अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही, ही बाब नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण करणारी ठरत आहे. दरम्यान,१ मे महाराष्ट्र दिनापासून ग्रामस्थ व वाहनधारकांच्या वतीने स्वाक्षरी मोहीम सुरू करण्यात आली असून, पुढील काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत :संबंधित दोन्ही रस्त्यांचे तात्काळ नूतनीकरण करण्यात यावे,घाटातील धोकादायक वळणे व घसरडी ठिकाणे मजबूत करून सुरक्षितता उपाययोजना कराव्यात,संपूर्ण मार्गासाठी नव्या रस्त्याच्या बांधकामाचा प्रस्ताव तातडीने मंजूर करावा.अपघात टाळण्यासाठी सूचना फलक,गाडीरेल व प्रकाशयोजना करावी.

वरील मागण्यांवर तात्काळ कार्यवाही न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.ग्रामस्थांनी शासनाने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती उपाययोजना करावी,अशी मागणी केली आहे.

# भाजपा नगरसेविका अश्विनी ताई भरत मते यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे लोकार्पण

**दैनिक युवक आधार**
**घाटकोपर (केतन भोज)** : भारतीय जनता पक्षाच्या प्रभाग क्रमांक १२९ च्या नगरसेविका अश्विनी ताई भरत मते यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे लोकार्पण महाराष्ट्राची गौरवशाली परंपरा, मराठी अस्मिता आणि हुतात्म्यांच्या त्यागाचे स्मरण करण्याचा सोहळा म्हणजे १ मे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून घाटकोपर विभागातील कबड्डीच्या क्षेत्रात नावाजलेले यंग स्पोर्ट्स क्लब संस्थेचे मा.अध्यक्ष यशवंत माझीरे यांच्या हस्ते पारंपारिक पूजा करून शुक्रवारी सकाळी १०.३० वाजता अरिहंत हाईटस,तळमजला, पारशीवाडी, घाटकोपर(पश्चिम) येथे संपन्न झाले.या कार्यक्रमाला भरत मते साहेब ,विनायक कोरडे (मास्तर) सुहास कोल्हे,शिवाजी सोनवणे,अरुण घाडीगांवकर,महादेव पवळे, प्रदीप पांडे, ह.भ.प तानाजी तांबारे महाराज,रमेश मोहिते शिवाजी लिमसे, शहाजी शिंदे,



अरूण पवार, दिलीप आंबुडकर, रोहिदास आवटे, छोटेलाल यादव, भोनू दुबे, सनद ओझा, संतोष सिंह,संतोष शिंदे, सुनील रोगें,चंद्रसेन नाईक, अशोक भाई टेलर , रमेश मेडिगा,वसंत सावंत, रूपचंद विश्वकर्मा, संदीप यादव, प्रमोद चव्हाण कार्यालय कर्मचारी विश्वनाथ तांबूटकर, तसेच स्थानिक नागरिक, भाजपा पक्षाचे कार्यकर्ते तसेच सामाजिक, सांस्कृतिक,कला,क्रिडा क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.या जनसंपर्क कार्यालयाच्या सोहळ्यात अश्विनी ताई मते यांनी नागरिकांशी संवाद साधत विकासकामे, स्थानिक समस्या आणि त्यांचे निराकरण यावर भर दिला.

नवीन जनसंपर्क कार्यालयातून नागरिकांना थेट संपर्क साधता येणार असून, विविध सामाजिक उपक्रम, जनजागृती मोहिमा, आरोग्य आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.या कार्यालयामुळे परिसरातील जनतेला त्यांच्या समस्या मांडण्यासाठी एक नवे व्यासपीठ मिळाले असून, पक्षाच्या कार्याला अधिक गती मिळेल अशी अपेक्षा प्रभाग क्रमांक १२९ च्या नगरसेविका अश्विनी ताई मते यांनी व्यक्त केली.अश्विनी ताई भरत मते यांची ही चौथी टर्म असून त्यांना महानगरपालिकेतील प्रशासकीय कामाचा दांडगा अनुभव आहे. तसेच त्यांनी आरोग्य समिती अध्यक्षा असताना विभागातील अनेक नागरिकांच्या आरोग्य विषयक समस्या सोडविल्या आहेत. प्रभागातील तळापासून डोंगराच्या शेवटच्या झोपडी पर्यत पाणी पोहचवले. प्रभागात पथदिवे, रस्ते दुरुस्ती,खड्डे बुजवणे, पाणीपुरवठा, नालेसफाई मलनिस्सारण व्यवस्था कचरा व्यवस्थापन व सार्वजनिक शौचालये, पावसाळ्यात पूर नियंत्रण व आपत्ती व्यवस्थापन अशी विकास कामे त्यांनी त्यांच्या कार्यकाळात केली.

सध्या त्या एन वार्ड प्रभाग समिती अध्यक्षा असून महिला बाल कल्याण सदस्य, बाजार उद्यान समिती सदस्य आहेत.

# श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय रिसोडच्या विद्यार्थ्यांचे सुयश !


कु.साक्षी भागवत रंजवे (81.33%)


कु.आयशा फिरदौस मकसुद शाह(75.00%)


कु. सना परवीन सय्यद दस्तगीर (76.17%)


कु.वैष्णवी दिलीप गोल्हारे(80.17%)

**दैनिक युवक आधार**
**रिसोड(प्रतिनिधी) :-रणजितसिह. ठाकूर** : उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च 2026 चा निकाल दि 2 मे रोजी ऑनलाइन पद्धतीने जाहीर झाला असून, यामध्ये श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड च्या विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले आहे.

या कनिष्ठ महाविद्यालयातील मराठी कला, उर्दू कला,वाणिज्य व विज्ञान शाखेतील एकूण 279 विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. यापैकी 238 विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल 85.30 % इतका लागला आहे.

यामध्ये विज्ञान शाखेतुन कु.आयशा फिरदौस मकसुद शाह ही 75.00% गुण मिळवुन प्रथम आली, तर विज्ञान शाखेतून कु. आफिया परविन शेख अशफाक 74.00 % द्वितीय आली आहे, तर कु.प्रेषिता विश्वनाथ खंडारे 68.50 % गुण प्राप्त करत तृतीय आली आहे. वाणिज्य शाखे मधून प्रथम कु.साक्षी भागवत रंजवे 81.33%, द्वितीय बद्रीनाथ एकनाथ देवकर 79.17% तर तृतीय कु.सृष्टी लक्ष्मण कदम 76.50 % आली आहे.

कला शाखा (उर्दू) मधून कु.सना परवीन सय्यद दस्तगीर 76.17 % प्रथम, कु. नजमुस सहेर मोहम्मद सादिक 75.67 % द्वितीय, व कु.हुनैन फिजा सगदर खान 71.33 % तृतीय आली आहे. कला शाखा(मराठी) मधून कु.वैष्णवी दिलीप गोल्हारे 80.17 % गुण घेऊन प्रथम आली आहे. सार्थक संतोष शिंदे 68.00 % द्वितीय व युवराज राजू धांडे 66.33% गुणासह तृतीय आला आहे.

या कनिष्ठ महाविद्यालयातील एकूण 279 विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ठ झाले होते. त्यापैकी 7 विद्यार्थी विशेष प्राविण्य मिळवून उत्तीर्ण झाले. 23 विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत तर 136 विद्यार्थी द्वितीय श्रेणीत व 72 विद्यार्थी पास श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष तथा शिक्षक आमदार ॲड.श्री किरणराव सरनाईक, श्री शिवाजी शिक्षण संस्था वाशिम चे सर्व सन्माननीय पदाधिकारी तसेच श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड चे शाळा समिती संचालक श्री पंजाबराव देशमुख, श्री जितेंद्रकुमार दलाल,श्री संजयकुमार जीरवणकर, प्राचार्य श्री संजयराव देशमुख, उपमुख्याध्यापक श्री संजयराव नरवाडे, पर्यवेक्षक श्री. गजाननराव भिसडे सर्व प्राध्यापक शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी अभिनंदन केले आहे.

# वृत्तपत्र लेखकांचे काम समाजासाठी जागल्यांचे-पद्मश्री उदय देशपांडे,मधू शिरोडकर यांच्या 'कालप्रवाह'पुस्तकाचे प्रकाशन

**दैनिक युवक आधार**
**गुरुनाथ तिरपणकर** : समाजासाठी एखादी गोष्ट चांगली असो वा वाईट हे दृष्टीस पडल्यानंतर वृत्तपत्र लेखक अधिक अस्वस्थ होतो.हातात लेखणी घेऊन ती घटना किंवा लोकांना भेडवसणारी समस्या तो लिहितो आणि एखाद्या दैनिकाकडे पाठवत नाही तोपर्यंत त्याला झोप येणार नाही,भले ते छापून येईल कि नाही याची पर्वा त्याला नसते.परंतु समाजातल्या जागल्याची भूमिका घेत आपण व्यक्त होऊ शकतो. याचे तुम्हाला समाधान असते. मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई ही संस्था महाराष्ट्रातील अशा हजारो जागल्यांना एकत्र करुन सातत्याने कार्यक्रम, उपक्रमांच्या माध्यमातून गेल्या७५वर्षाहून अधिक काळ चळवळीच्या रुपात कार्यरत आहे.समाजाच्या दृष्टीने हे काम महत्त्वाचे आहे, असे उदगार पद्मश्री उदय देशपांडे यांनी काढले.मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईचे माजी अध्यक्ष जेष्ठ वृत्तपत्र लेखक मधू शिरोडकर यांच्या कालप्रवाह या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच दादर येथे नवशक्तीचे संपादक प्रकाश सावंत आणि माजी संपादक प्रकाश कुलकर्णी यांच्या हस्ते



पार पडले त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. वृत्तपत्र लेखक आणि नवशक्ती जमका सदर यांचे ऋणानुबंध प्रभाकर यांच्या काळापासून गेली७५वर्षे आहेत.दररोज सर्वाधिक पत्रे नवशक्तीकडे येतात हे नाते जपण्यासाठी त्यांना आमच्याकडून पूर्ण पानभर प्रसिद्धी दिली जाते.यापुढच्या काळात वृत्तपत्र लेखकांकडून अभ्यासपूर्ण परंतु परखडपणे लिहावे अशीही आमची इच्छा आहे असे आवाहन नवशक्तीचे संपादक प्रकाश सावंत यांनी सांगितले.मधू शिरोडकर यांचे पत्रलेखक आणि वृत्तपत्र लेखक संघासाठी किती महत्त्वाचे आहे याचे विवेचन नवशक्तीचे माजी संपादक प्रकाश कुलकर्णी यांनी केले.वाचकांची मते किती महत्त्वाची आहे हे स्पष्ट करताना जगभरातील वर्तमानपत्रांमध्ये संपादकीय पानावर अनेक सुप्रसिद्ध लोकांनी केले आहे, चर्चिल आणि आणि ब्रिटिश साहित्यिकांचे दाखल त्यांना यावेळी दिले.जेष्ठ साहित्यिक अशोक बेंडखळे यांनी संस्थेचा पत्रवृत्तांत लिहिताना संस्थेची वाटचाल आणि इतिहास कसा प्रगल्भ आहे हे सांगितले.मधू शिरोडकर यांनी५०वर्षापूर्वीची संघाची वाटचाल आणि जुन्या कार्यकर्त्यांच्या आठवणी सांगितल्या.यावेळी माजी उप महापौर अरुण देव, संघाचे माजी अध्यक्ष विजय कदम, माजी प्रमुख कार्यवाह विश्वनाथ पंडित, नंदकुमार रोपळेकर आणि दत्ताराम घुगे यांचीही भाषणे झाली.संघाचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे यांनी प्रास्ताविक केले तर कार्यक्रम प्रमुख दिगंबर चव्हाण यांनी सुत्रसंचलन आणि माजी अध्यक्ष मनोहर साळवी यांनी आभार प्रदर्शन केले. महाराष्ट्र राज्य आणि मराठी माणसांचे मूलभूत प्रश्न सातत्याने सेवाभावीवृत्तीने व निर्भीडपणे आपल्या लेखणीतून सातत्याने पदरमोड करुन जनजागृती हे जे काम करीत आहेत अशा वृत्तपत्र लेखकांना१)ग.शं.सामंत स्मृती"निर्भीड जागल्या सन्मान पुरस्कार"विश्वनाथ पंडित२) विजय ना कदम पुरस्कृत'निर्भीड जागल्या'पुरस्कार अरुण खटावकर३) रवींद्र मालुसरे पुरस्कृत'निर्भीड जागल्या'पुरस्कार गुरुनाथ तिरपणकर४) दिलीप ल.सावंत पुरस्कृत निर्भीड जागल्या पुरस्कार लीना वालावलकर५) रमेश सांगळे पुरस्कृत निर्भीड जागल्या पुरस्कार श्रीनिवास डोंगरे६) ॲड.मनमोहन चोणकर पुरस्कृत निर्भीड जागल्या पुरस्कार संजय साळगावकर७)आबासाहेब आतार पुरस्कृत निर्भीड जागल्या पुरस्कार सूर्यकांत भोसले८) मधुकर कुबल पुरस्कृत निर्भीड जागल्या पुरस्कार राजन देसाई९) चंद्रकांत पाटणकर पुरस्कृत निर्भीड जागल्या पुरस्कार नितीन कदम१०) कृष्णा काजरोळकर पुरस्कृत निर्भीड जागल्या पुरस्कार दत्ता खंदारे११)सतिश भोसले पुरस्कृत निर्भीड जागल्या पुरस्कार शिरीष बने१२) आत्माराम गायकवाड पुरस्कृत निर्भीड जागल्या पुरस्कार कमलाकर जाधव१३)पास्कल लोबो पुरस्कृत निर्भीड जागल्या पुरस्कार भाऊ सावंत१४)मनोहर साळवी पुरस्कृत निर्भीड जागल्या पुरस्कार अनंत दाभोळकर१५) प्रशांत घाडीगांवकर पुरस्कृत निर्भीड जागल्या पुरस्कार रामचंद्र जयस्वाल१६) दिलीप दळवी पुरस्कृत निर्भीड जागल्या पुरस्कार पंकज पाटील१७) दिगंबर चव्हाण पुरस्कृत निर्भीड जागल्या पुरस्कार दीपक गुंडये या पत्रलेखकांचा संघाच्या वतीने"निर्भीड जागल्या"पुरस्कार प्रदान करुन यावेळी सन्मानित करण्यात आले.तर पत्रस्पर्धेतील यशस्वी ठरलेल्या विजय ना कदम,मधुकर कुबल,नीशा शेरे, रामचंद्र मेस्त्री,प्रा.जयवंत पाटील यांना प्रशस्तीपत्र देण्यात आले.

# चौल भोवळे दत्तमंदिर रस्त्याची दुरावस्था ; ज्येष्ठ भक्तांना वंचित, शासन कधी जागेल?

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे/अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी** : चौल-भोवळे दत्तमंदिराची अपार श्रद्धा असलेल्या लाखो भक्तांसाठी वाईट बातमी. मंदिरापर्यंत जाणाऱ्या सराई-देवघर मार्गावरील रस्ता पूर्णपणे उद्ध्वस्त झाला असून, ज्येष्ठ नागरिक, वृद्ध आणि पायऱ्या चढू न शकणाऱ्या भक्तांना आता मंदिर दर्शन घेता येत नाही. रायगड जिल्हा परिषदेच्या चौकटीतील हा रस्ता खड्ड्यांनी आणि खडीने भरलेला असल्याने रिक्षा, चारचाकी वाहने घसरत आहेत, अपघात होत आहेत. तरीही शासनाकडून काहीच हालचाल नाही – दत्तभक्तांच्या डोळ्यांत अश्रू आणि प्रशासनाच्या दुर्लक्षाने रायगडकर संतप्त ! सुमारे ७५० पायऱ्या असलेल्या भोवळे दत्तमंदिरात सर्वजण पोहोचू शकत नाहीत. त्यासानिलेश फुंडे/अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी

ठी पलिकडून सराई-देवघर मार्गे स्वामी समर्थ मठापर्यंत रस्ता केला होता. परंतु आता हा रस्ता फुटलेला, खड्ड्यांनी खचलेला आणि खडीने व्यापलेला आहे. ठाणे, मुंबई, पुणे येथून दुरून येणारे दत्तभक्त गाड्यांनी मंदिरात जायला निघतात, पण रस्त्याच्या दुरावस्थेमुळे ते अशक्य झाले आहे. "रिक्षा चढवावर चढू शकत नाही, घसरली तर अपघात होईल आणि जबाबदारी कोण घेणार? मंदिरात दर्शन घ्यायचं म्हणून प्रवासी, पर्यटक भाडे देत आहेत, पण प्रवासाचा धोका मात्र आम्हाला सहन करावा लागतो," अशी खंत चौल रिक्षा स्टँड संघटना युनियनचे अध्यक्ष राजेश मळेकर यांनी व्यक्त केली.

खासगी वाहनधारकही घाबरून दूर राहत आहेत. कितीतरी छोटे-मोठे अपघात घडले आहेत – रिक्षा घसरून मागे जाऊन धडकल्या आहेत. ज्येष्ठ नागरिक, अपंग आणि पर्यटकांना



मंदिर दर्शनापासून वंचित राहावे लागत आहे. पर्यटन स्थळ असलेल्या या भागात भक्तांची गर्दी असते, पण रस्त्याच्या वाईट अवस्थेमुळे आर्थिक नुकसान होत आहे. तरीही रायगड जिल्हा परिषद किंवा शासनाकडून दुरुस्तीची कोणतीच पावले उचलली गेलेली नाहीत. "शासन कधी जाग होणार? दत्तभक्त आणि रायगडकरांचे लक्ष लागले आहे," असा सवाल उपस्थित होतोय.

चौल रिक्षा संघटना युनियनचे अध्यक्ष राजेश मळेकर म्हणाले, "रस्त्याची अक्षरशः दुरावस्था झाल्यामुळे रिक्षा चढाव चढू शकत नाही. अपघात झाला तर जबाबदारी कोण घेणार? दत्तमंदिरात जायचं म्हणून भाडे घेत नाही, त्यामुळे प्रवाशांचा गैरसमज होतो.

शासनाने तात्काळ दुरुस्ती करावी, अन्यथा भक्तांच्या श्रद्धेला धक्का बसेल."दत्तभक्तांच्या श्रद्धास्थळाकडे दुर्लक्ष? शासनाच्या या उपेक्षेला रायगडकर कधी उत्तर देतील? जिल्हा परिषद प्रशासनाने तातडीने रस्ता दुरुस्त करावा, अन्यथा आंदोलनाचा इशारा चौल रिक्षा संघटनेने दिला आहे.

# कामोठ्यात 'अस्मिता महाराष्ट्राची'; दिशा व्यासपीठाच्या 100 उपक्रमांचा उत्सव संपन्न






**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवणाऱ्या दिशा व्यासपीठाने १०० यशस्वी उपक्रमांचा गौरवशाली टप्पा यशस्वीपणे पूर्ण केला आहे. या ऐतिहासिक कामगिरीचे औचित्य साधून आणि 'महाराष्ट्र दिना'चे निमित्त साधून कामोठे येथील राधाई स्कूलमध्ये अस्मिता महाराष्ट्राची हा विशेष सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला.या दिमाखदार सोहळ्यात रॉयल महाराष्ट्र रनवे'आणि रॉयल महाराष्ट्र गौरव सोहळा' चे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्राची समृद्ध लोककला आणि ऐतिहासिक वैभव यांचा सुरेख संगम यावेळी उपस्थितांना अनुभवायला मिळाला.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरलेल्या 'रॉयल महाराष्ट्र रनवे'वर बालकलाकार आणि महिलांनी महाराष्ट्राच्या लोककलेचे बहारदार सादरीकरण केले. पारंपरिक आणि ऐतिहासिक महाराष्ट्रीयन पोशाख परिधान करून या कलाकारांनी राज्याच्या संस्कृतीचे दर्शन घडवले. ऐतिहासिक वारसा आणि आधुनिक सादरीकरण यांचा संगम या सोहळ्याचे वेगळेपण ठरले.

या सोहळ्याचे आणि पुरस्कारांचे अनावरण विधानपरिषद आमदार मा. विक्रांतदादा पाटील आणि उपमहापौर प्रमिला पाटील ,मा. विमल बिडवे (पोलीस निरीक्षक, कामोठे), इंदू झा, भूषण अरुणा अजित पोवळे, यांच्या हस्ते करण्यात आले. आमदार विक्रांतदादा पाटील यांनी संस्थेच्या प्रवासाचे कौतुक करताना सांगितले की, १०० उपक्रम यशस्वीपणे पूर्ण करणे ही सोपी गोष्ट नाही. यासाठी लागणारी जिद्द आणि सामाजिक तळमळ वाखाणण्याजोगी आहे. दिशा व्यासपीठाने समाजाप्रती असलेली आपली बांधीलकी यातून सिद्ध केली आहे.

१०० उपक्रमांच्या यशस्वीतेमागे असलेल्या विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा यावेळी गौरव करण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने सामाजिक कार्यकर्ते गौरव पोरवाल,डॉ. रुक्मिणी अर्जुन, डॉ. सुप्रिया वाकचौर तसेच सौ. मनिषा पाटील, सौ. जयश्री राठोड, सौ. राजश्री थोरात, मंदाकिनी पाटील, मा. जयकुमार डिगोळे, सौ. माधुरी पानसरे, सौ. अश्विनी ढोके, मा. अखिलेश जाधव, डॉ. श्वेता गजाभिये, डॉ. सुवर्णा चोपडे, सौ. निता माळी, सौ. सविता कदम, सौ. शर्वरी पाटणे, मा. देवदत्त घरत, मा. तुषार पाटील, मधुरा दंडवते, सौ. मोहिनी पुजारी, डॉ. प्रांजली वैभव अंधारे आणि मिताली म्हात्रे, माधवी म्हात्रे यांचाही गौरव करण्यात आला. सामाजिक घडामोडींचे वार्तांकन करणाऱ्या पत्रकार बांधव साहिल रेळेकर, गौरव जहागिरदार, संजय कदम, रत्नाकर पाटील, गणेश कोळी, भालचंद्र जुमलेदार, संतोष आमले, अरुणकुमार मेहत्रे आणि नितीन देशमुख, गणेश जगताप , अण्णासाहेब आहेर यांचे यावेळी आभार मानून गौरविण्यात आले.

संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा निलम आंधळे यांच्यासोबत सावलीप्रमाणे खंबीरपणे साथ देणाऱ्या उपाध्यक्ष विद्या मोहिते यांचाही आमदार साहेबांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. दिशा व्यासपीठाच्या सदस्य वाढीसाठी मदत करणाऱ्या संख्यांचादेखील यावेळी सन्मानचिन्ह देण्यात आले.कमोठ्यातील अन्य मान्यवर देखील या उपक्रमास उपस्थित होते.

यावेळी बोलताना निलम आंधळे भावूक होऊन म्हणाल्या की, हा सोहळा दिशा व्यासपीठाला योगदान देणाऱ्या सर्व व्यक्तींसाठी आहे. आजवर अनेकांचे वेगवेगळ्या माध्यमातून मोलाचे योगदान मिळाले आहे, त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करताना आम्हाला आत्मिक आनंद होत आहे.

---

## महाराष्ट्र दिनानिमित्त वनपरिक्षेत्र कार्यालयात ध्वजारोहण, पाणपोई उद्घाटन व वनवा जनजागृती कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : सोयगाव येथे आज १ मे महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त वनपरिक्षेत्राधिकारी अनिल मिसाळ यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. यावेळी उपस्थितांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाच्या पुढील टप्प्यात नागरिकांच्या सोयीसाठी पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले.तसेच उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर डोंगराळ भागात वारंवार घडणाऱ्या वनव्यासारख्या घटनांबाबत जनजागृती करण्यासाठी विशेष अभियान राबविण्यात आले.वनवामुळे होणारे पर्यावरणीय नुकसान, वनसंपत्तीची हानी आणि वन्यजीवांवरील परिणाम याबाबत उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी अनिल मिसाळ,वनपाल प्रवीण कोळी,वनरक्षक




एम. एम.अली,सुभाष नागरे,वनरक्षक शिवदास चौधरी,वनरक्षक शमीम तडवी,वनरक्षक अनिल लोखंडे,वनरक्षक कृष्णा धोतरे,वनरक्षक मंगेश सणांसे,वनरक्षक निलेश मुलताने,वनरक्षक जयश्री आगळे,वनरक्षक सुप्रिया चौधरी,वनरक्षक बी बी काकडे,वनरक्षक मनगटे,वनरक्षक सपकाळ,वनरक्षक काळे आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमात बोलताना अनिल मिसाळ यांनी सांगितले की, "वनसंपत्तीचे संरक्षण ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असून, विशेषतः उन्हाळ्यात नागरिकांनी अधिक सतर्क राहून वनवा टाळण्यासाठी सहकार्य करणे आवश्यक आहे."दरम्यान,सोयगाव शहराजवळ वनपरिक्षेत्र कार्यालयाची नवीन इमारत अनिल मिसाळ यांच्या कार्यकाळात प्रथमच उभारण्यात आली असून, त्यामुळे प्रशासनिक कामकाज अधिक प्रभावी व सुलभ होणार असल्याचे सांगण्यात आले.

---

## दर्यापूर तालुका सर्व पत्रकार संघाच्या उपाध्यक्षपदी आशिष तेलगोटे, अध्यक्षपदी हरिदास खडे

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी दरियापुर** : अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने दर्यापूर तालुका सर्व पत्रकार संघाच्या कार्यकारिणीची निवड आज जाहीर करण्यात आली. यामध्ये उपाध्यक्षपदी आशिष राजकुमार तेलगोटे यांची तर अध्यक्षपदी हरिदास भाऊ खडे यांची एकमताने निवड करण्यात आली.

या कार्यक्रमाला मान्यवरांची उपस्थिती

दर्यापूर येथे आयोजित कार्यक्रमात ही निवड जाहीर करण्यात आली. यावेळी कान्होली गावचे नागरिक



नितिन पाटिल राऊत, भुषन काठोळे, संदीप इंगळे, बंटी आठवले, अरविंद्र चक्रे, अमर वानखडे यांच्यासह अनेक पत्रकार बांधव व मान्यवर उपस्थित होते.

नवनिर्वाचित अध्यक्ष हरिदास भाऊ खडे व उपाध्यक्ष आशिष तेलगोटे यांचा यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. ग्रामीण भागातील पत्रकारांच्या समस्या सोडवण्यासाठी व पत्रकारितेचा दर्जा उंचावण्यासाठी संघटना कटिबद्ध राहील, असा विश्वास यावेळी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

पत्रकारांच्या हितासाठी काम करणार

सत्काराला उत्तर देताना नवनिर्वाचित उपाध्यक्ष आशिष तेलगोटे म्हणाले, "दर्यापूर तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांना सोबत घेऊन संघटन मजबूत करू. ग्रामीण पत्रकारांच्या अडीअडचणी शासन दरबारी मांडून त्या सोडवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करू."

अध्यक्ष हरिदास भाऊ खडे यांनीही पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी व पत्रकारितेतील नीतिमूल्ये जपण्यासाठी संघटना सदैव अग्रेसर राहील, अशी ग्वाही दिली.

या निवडीबद्दल दर्यापूर तालुक्यातील पत्रकार वर्तुळातून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन होत आहे.

---

## पिंडकेपार - बोदरा फाटा जवळ चार व्यक्तींवर रानडुकरांचा हल्ला; 4 व्यक्ती जखमी तीन भंडारा रवाना

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे/भंडारा** : साकोली जवळ असलेल्या पिंडकेपार - बोदरा फाटा जाणाऱ्या रस्त्यावर चार व्यक्तींवर रानडुकरांनि झडप घातली त्या चारही जखमीना भेट दिली असता तीन लोकांना भंडारा रवाना करण्यात आले

सविस्तर ऋत असे की बांपेवाडा येथील ताजराम जांभुळकर 54 वर्ष, अमरदीप राजीराम वलथरे 29 वर्ष, भजनदास आत्माराम बोंबाडे मनोज, ताजराम जांभूळकर 54 वर्ष दोन लोक कामाकरता व दोन लोक मरणाकारिता जात असताना हि पिंडकेपार जवळ असलेल्या बोदरा फाट्यावर डुकरांच् कळप जात



असताना डुकरांनी यांच्यावर हल्ला केला त्यामध्ये तीन लोक गंभीर जखमी झाले तर 1 साधारण जखमी असून दीपक केवळ राम वलथरे, भजनदास आत्माराम बंबाडे, अमरदीप राजाराम वलथरे, या

3 लोकांना भंडारा रवाना करण्यात वन विभाग नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प डिपार्टमेंटचे लोकांनी आणि पोलीस विभागाच्या लोकांनी भेट दिली चौकशी केली परंतु कोणत्या प्रकारची मदत देण्यात आलेले नाही.उलट फॉरेस्ट चे लोक त्या लोकांना म्हणाले की बाबा तुम्ही दारू पिऊन गाडी चालवता अशा पद्धतीचे बोलणे केले सायंकाळी 5 च्या दरम्यान वंचित बहुजन आघाडीचे भंडारा जिल्हा महासचिव डी जी रंगारी यांनी भेट देऊन त्यांची विचारपूस केली व जखमींना तात्काळ मदत करावी अशी मागणी केली जिल्हास्तरीय दवाखान्यात जे काही औषधोपचार करण्यात येईल त्यातील सुद्धा खर्च देण्यात यावा आतापर्यंत वाघाच्या हल्ल्यात तीन-चार घटना झाले वाघ हल्ल्यात तीन चार लोकांचा बळी घेतला आणि पिंडकेपार परिसरात रानडुकरांच्या कळप त्या ठिकाणी फिरत आहे अशी माहिती मिळालेली आहे त्या वन्यजीव प्राण्यांच्या बंदोबस्त फॉरेस्ट डिपार्टमेंट करावा अशी वारंवार मागणी करण्यात येत असताना सुद्धा कर्मचारी मात्र निंद्रावस्थेत असताना आपल्याला दिसत आहेत त्यांच्या कोणत्या प्रकारच्या उपाययोजना काही दिसत नाही आणि लोकांवर हल्ले होत आहेत लोकांच्या बळी जात आहे लोकांच्या शेताचे नुकसान होत आहेत याला जबाबदार कोण म्हणून फॉरेस्ट डिपार्टमेंट तात्काळ उपाय योजना करावी वन्यजीव प्राणी जंगलाच्या बाहेर येऊ नये लोकांवर हल्ला होऊ नये याची सर्व जबाबदारी कर्मचाऱ्यांनी घ्यावी अशी ही मागणी वंचित बहुजन आघाडीचे भंडारा जिल्हा महासचिव डी जी रंगारी यांनी केलेले अन्यथा जन आंदोलन करण्याचा इशारा सुद्धा देण्यात आला

---

## मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते येवल्यात नमो उद्यानाचे भूमिपूजन

**नाशिक** : शहराचा विकास रस्ते, इमारती किंवा उद्योग यापुरता मर्यादित नसतो, तर नागरिकांच्या जीवनमानात आनंद, आरोग्य आणि समाधान वाढवणाऱ्या सुविधा देखील निर्माण होणे आवश्यक असते. नमो उद्यान ही त्याच विचाराची फलश्रुती आहे. राज्य सरकारने या प्रकल्पासाठी १ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या माध्यमातून अत्याधुनिक सोईसुविधा असलेले उद्यान येवला शहरात निर्माण होणार असून नमो उद्यानातून येवल्याच्या वैभवात अधिक भर पडेल, असे प्रतिपादन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले. मंत्री श्री. भुजबळ यांच्या हस्ते येवला शहरातील पटेल कॉलनीत नमो उद्यानाचे भूमिपूजन झाले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. माजी खासदार समीर भुजबळ, नगराध्यक्ष राजेंद्र लोणारी, येवला नगरपालिकेचे मुख्याधिकारी तुषार आहेर, नगरसेवक पारूल गुजराथी, प्रवीण बनकर, महेश काबरा, गोटू मांजरे, जावेद लखपती, नगरसेविका लक्ष्मीबाई साबळे, दिपक लोणारी राजेश भांडगे, यांच्यासह अधिकारी व



नागरिक उपस्थित होते.यावेळी मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, येवला शहराच्या विकासाच्या इतिहासात एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. "नमो उद्यान" हा अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि लोकाभिमुख प्रकल्प आहे. हे उद्यान केवळ एक बाग नाही, तर येवल्याच्या प्रगतीचे, सौंदर्याचे आणि आधुनिकतेचे प्रतीक ठरणार आहे. येवला म्हणजे परंपरा आणि संस्कृतीची भूमी. पैठणीसाठी जगप्रसिद्ध असलेले आपले शहर, शिवसृष्टी आणि मुक्तीभूमीसारख्या प्रेरणादायी प्रकल्पांमुळे आधीच ओळख निर्माण करत आहे. आता "नमो उद्यान" या नव्या उपक्रमामुळे येवला शहराच्या विकासात आणखी एक सुवर्णपान जोडले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.


---

## कालिकादेवी कनिष्ठ महाविद्यालय,बारावीच्या परीक्षेत ठरले अव्वल

### चिं.अथर्व केशव भांगे मुलांमधून पहिला तर कु.श्रावणी नितीन कदम मुलींमधून पहिली

**दैनिक युवक आधार**

**(शिरूर कासार)** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांच्या वतीने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे.आदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचलित,कालिकादेवी कनिष्ठ महाविद्यालयाने याही वर्षी बोर्डाच्या निकालात विभागातून अव्वल स्थान पटकाविले आहे. विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या मार्गदर्शनामुळे तिन्ही शाखेत एकूण ४५३ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले होते.त्यापैकी २३८ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले,तर १६०विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणीतील गुण संपादन करून निकालाचे स्थान अव्वल ठेवले आहे.कनिष्ठ महाविद्यालयाचा एकूण सरासरी निकाल ९८.६७ % टक्के लागला आहे.विद्यालयाचे गुणवंत विद्यार्थी पुढील प्रमाणे आहेत. (विज्ञान शाखेतून)कु.श्रावणी नितीन कदम(९४.१७%)टक्के मिळवून प्रथम आली.कु.प्रीती अभिमान उगले(९३.३३%)टक्के व कु.स्नेहल अण्णासाहेब ढाकणे(९३.३३%) या दोघींनी समान गुण घेऊन द्वितीय



क्रमांक पटकावला तर,चिं.अथर्व केशव भांगे(९३.००%) टक्के घेऊन तृतीय क्रमांक मिळविला.(कला शाखेतून)चिं.विशाल अरुण भिल्लारे (८२.००%) टक्के घेऊन प्रथम क्रमांक मिळविला.कु प्रतीक्षा लहू पुरी (८१.६७%) टक्के घेऊन द्वितीय



क्रमांक तर कु.शितल संतोष साळवे (८१.००%)टक्के व कु.आरती हनुमंत निटूकडे(८१.००%) टक्के या दोघींनी समान गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला.तसेच कु.संकेशा लाला गायकवाड (७९.६७%) टक्के गुण घेऊन उत्तेजनार्थ नंबर मिळविला. तसेच (वाणिज्य शाखेतून)कु.श्रीजा संतोषकुमार ढाकणे (८६.००%) टक्के घेऊन प्रथम क्रमांक पटकावला व कु.समृद्धी शरद शिंदे (७४.३३%) टक्के घेऊन द्वितीय क्रमांक तर कु.आयेशा नाशर शेख यांनी(७३.३३%) टक्के घेऊन तृतीय क्रमांक मिळविला. कॉपी मुक्तीच्या वातावरणातही आपले अव्वल स्थान ठेवल्यामुळे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव तथा माजी मंत्री जयदत्त(अण्णा) क्षीरसागर साहेब मा.रोहित(भैय्या) क्षीरसागर साहेब,प्रशासन अधिकारी डॉ.राजूजी मचाले साहेब,सहा. प्रशासन अधिकारी मा.योगेशजी पवार साहेब,कार्यवाहक एम.ए.राऊत,प्राचार्य केशव भांगे साहेब,उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक जनार्दन काळे,परीक्षा प्रमुख प्रा.नामदेव तरकसे,परीक्षा सहाय्यक प्रा. विनोद गलांडे,विज्ञान प्रमुख प्रा. संजय काकडे,वाणिज्य प्रमुख डॉ.सत्यनारायण ढवळे,सांस्कृतिक प्रमुख डॉ.आत्माराम झिंजुर्डे तसेच ज्यांनी वर्षभर अतिशय मेहनतीने अध्यापनाचे कार्य केले,ते सर्व विषयाचे कनिष्ठ प्राध्यापक,शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.